महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादक: राकेश शंकर गोरे | वर्ष: १५, अंक: ७, पृष्ठ: ८ | मुंबई, मंगळवार १४ मे २०२४ ते सोमवार २० मे २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

# काँग्रेसवाले खूप घाबरलेत, त्यांना रात्री स्वप्नातही...



## पाकिस्तानबाबतच्या त्या वक्तव्यावरुन पंतप्रधान मोदींचा टोला

**देशभर लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील मतदान चालू आहे. दुसऱ्या बाजूला, ज्या ज्या मतदारसंघांमध्ये निवडणुकीच्या उर्वरित टप्प्यांमध्ये (पाचवा, सहावा आणि सातवा टप्पा) मतदान होणार आहे तिथे अद्याप प्रचार चालू आहे. अशातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारच्या मुजफ्फरपूर येथे एनडीए उमेदवाराच्या प्रचारार्थ सभा घेतली. या सभेत बोलताना पंतप्रधानांनी काँग्रेस आणि इंडिया आघाडीवर हल्लाबोल केला. त्याचबरोबर त्यांनी काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर यांनी अलीकडेच पाकिस्तानबाबत केलेल्या वक्तव्यावरूनही काँग्रेसवर निशाणा साधला.**

■ मुंबई: यश सावंत

मणिशंकर अय्यर म्हणाले होते की 'भारताने पाकिस्तानशी सुसंवाद राखावा आणि आपल्या लष्करी सामर्थ्याचं प्रदर्शन करू नये, अन्यथा पाकिस्तान भारताविरुद्ध अण्वस्त्रे तैनात करू शकतो.', यावर प्रतिक्रिया देताना पंतप्रधान मोदी म्हणाले, हे काँग्रेसवाले पाकिस्तानला घाबरून राहतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, सध्या देशभर भारतीय जनता पार्टी आणि एनडीएचं वादळ घोंगावतंय. बिहारमध्येही तीच परिस्थिती मला पाहायला मिळत आहे. मी आता बिहारमध्ये पाहतोय की इथे जंगल राजवाला पक्ष भुईसपाट होत आहे. मी देशभर जिथे जातोय, बिहारमध्ये जिथे जिथे आतापर्यंत गेलो आहे त्या प्रत्येक ठिकाणी मला एकच गोष्ट ऐकायला मिळाली, ती म्हणजे 'फिर एक बार मोदी सरकार'ची घोषणा. माझं सर्व मतदारांना आवाहन आहे की ही निवडणूक म्हणजेच देशाची निवडणूक आहे, आपलं आणि आपल्या देशाचं भविष्य ठरवण्याची निवडणूक आहे, देशाचं नेतृत्व कोण करणार हे ठरवण्याची निवडणूक आहे, ही गोष्ट लक्षात घेऊनच तुम्ही मतदान करा. (शेष पृष्ठ २ वर)

## संक्षिप्त

### सीबीएसईचा बारावीचा निकाल जाहीर, यंदाही मुलींची बाजी

■ मुंबई: नितीन देवळेकर

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने बारावीचा निकाल जाहीर केला. यंदा उत्तीर्णतेचे प्रमाण ८७.९८ टक्के इतके आहे. २०२३ च्या तुलनेत यावर्षी उत्तीर्णतेच्या टक्केवारीत थोडीशी वाढ झाली आहे. यंदाच्या बारावी निकालातही मुलींनी बाजी मारली आहे. मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९१.५२ टक्के आहे. तर मुलांचे प्रमाण ८५.१२ टक्के एवढे आहे. याचाच अर्थ मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण



मुलांच्या तुलनेत ६.४० टक्के अधिक आहे. बारावी बोर्ड परीक्षेत ८७.९८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सुमारे २४ हजार विद्यार्थ्यांना सुमारे ९५ टक्क्यांपेक्षा जास्त आणि सुमारे १.१६ लाख विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून जास्त गुण मिळाले आहेत. विद्यार्थ्यांना ऑनलाइन निकाल पाहण्यासाठी त्यांचा रोल नंबर, शाळा क्रमांक आणि प्रवेशपत्र ओळखपत्र आवश्यक आहे. CBSE ने १५ फेब्रुवारी आणि २ एप्रिल दरम्यान इयत्ता १२वी परीक्षा घेतली होती.

### आठवडाभर पोलिसांच्या सुट्ट्या रद्द! २० तारखेपर्यंत अधिकारी-अंमलदार 'ऑनड्युटी'

■ नाशिक: सम्यक कासारे

नाशिक, दिंडोरी लोकसभा मतदारसंघासाठी २० तारखेला मतदान होते आहे. या पार्श्वभूमीवर आगामी दहा दिवसांसाठी शहर -जिल्ह्यातील पोलीस अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या असून, आगामी दहा दिवस पोलीस यंत्रणा 'ऑनड्युटी' राहणार आहेत. नाशिक व दिंडोरी लोकसभा मतदानासाठी पोलिस यंत्रणेची तयारी अंतिम




टप्प्यात आली आहे. कडेकोट बंदोबस्तासह पोलिसांची जादा कुमक येत्या आठवडाभरात शहरात दाखल होणार आहे. २० तारखेला नाशिक, दिंडोरी मतदारसंघात मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर नाशिक शहर आयुक्तालय व नाशिक ग्रामीण पोलिस दलातील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या साप्ताहिक सुट्ट्यांसह सर्व प्रकारच्या रजा बंद करण्यात आल्या आहेत. या काळात आणीबाणीच्या प्रसंगी वैद्यकीय रजा घेता येईल, परंतु त्यासाठीचे संबंधितांना वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे. नाशिक, दिंडोरी मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी येत्या बुधवारी (ता. १५) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा पिंपळगाव बसवंत येथे होते आहे. प्रचारासाठी येता आठवडाचा असल्याने सार्याच पक्षाच्या नेत्यांच्या सभा या आठवड्यात होत आहेत.

## अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाचा मोठा दिलासा; मुख्यमंत्रीपदाबाबत...

■ नवी दिल्ली: प्रगती शर्मा

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने १ जूनपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केल्यामुळे काहीसा केजरीवाल यांना २१ मार्च रोजी ईडीने अटक केली होती. त्यानंतर ते तिहार तुरुंगात होते. मात्र, काही दिवसांपूर्वी त्यांना न्यायालयाने १ जूनपर्यंत अंतरिम जामीन दिला. पण १ जूनला केजरीवाल



दिलासा मिळाला. यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना आणखी एक दिलासा देत केजरीवाल यांना मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी अरविंद केजरीवाल हेच राहणार असल्याचं आता स्पष्ट झालं आहे. दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी अरविंद यांना पुन्हा आत्मसमर्पण करावे लागणार आहे. केजरीवाल यांना ज्यावेळी ईडीकडून अटक झाली होती. त्यानंतर त्यांना मुख्यमंत्री पदावरून हटवण्यात यावे, अशी मागणी भाजपाच्या काही नेत्यांनी केली होती. मात्र, आपण दिल्लीचा कारभार तुरुंगातून चालवणार अशी भूमिका केजरीवालांनी घेतली होती. (शेष पृष्ठ २ वर)

## अजित पवारांना शरद पवार 'व्हिलन' बनवत होते, कारण... देवेंद्र फडणवीस यांचा मोठा गौप्यस्फोट

■ मुंबई: सचिन कदम

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट तयार झाले आहेत. अजित पवार यांनी शरद पवार यांची साथ सोडत महायुतीची संगत घेतली. अजित पवार यांनी महायुतीसोबत येण्याचा प्रयत्न यापूर्वी केला. परंतु तो यशस्वी झाला नव्हता. भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी आणि भाजपच्या युतीची चर्चा आणि अजित पवार यांच्यासंदर्भात गौप्यस्फोट केला आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर सनसनाटी निर्माण करणारा आरोप केला आहे. शरद पवार अजित पवार यांना व्हिलन बनवत असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. मुलाखतीत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शरद पवार यांना भाजपसोबत युती हवी होती. तीन वेळा त्यांनी यासंदर्भात निर्णय घेतला. परंतु तो फिरवला. आता त्याचे विश्लेषण करताना मला वाटते की, शरद पवार नेहमी अजित पवार यांना पुढे करुन



व्हिलन बनवत होते. कारण राष्ट्रवादी पक्ष अजित पवार यांच्यासोबत होता. अजित पवार यांचे पक्षातील वजन कमी करता येत नव्हते. परंतु त्यांना व्हिलन तर बनवता येईल, हाच त्यांचा विचार होता. अजित पवार यांना व्हिलन बनवून घरात कोणाला तरी हिरो बनवण्याचे काम शरद पवार यांनी केले. कारण पक्षावर त्यांना त्यांचीच सत्ता हवी होती. (शेष पृष्ठ २ वर)

## अवकाळी पावसाचा गव्हासह आंबा आणि धान्याला मोठा फटका; कृषी विभागाचा अहवाल

■ नागपूर: नितीन देवळेकर

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ८ गावांतील २२ शेतकऱ्यांच्या सुमारे २१.२ हेक्टरवरील शेती पिकांचे पावसामुळे नुकसान झाले. एप्रिलनंतर मे मध्येही अवकाळी पावसाची हजेरी कायम आहे. गुरुवारी जिल्ह्यामध्ये झालेल्या दमदार पावसामुळे विविध तालुक्यांधील गावांतील उन्हाळी धानासह रब्बी हंगामातील गहू आणि आंबा पिकाला जबर फटका बसला



आहे. गुरूवारला जिल्ह्यामध्ये सकाळपासूनच सोसाट्याच्या वाऱ्यासह दमदार पावसाने हजेरी लावली. सुमारे तासाभराहून अधिक काळ झालेल्या या दमदार पावसाने शहरासोबतच ग्रामीण भागातीलही जनजीवन अस्तव्यस्त केले. शहरामध्ये अवकाळी पाऊस व वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडांची पडझड झाली. ग्रामीणमध्येही या अवकाळी पावसामुळे झाडांच्या पडझडीसोबतच वीज पडून एका शेतकऱ्याला आपला जीव गमवावा लागला. या अवकाळी पावसामुळे शेती पिकांचेही काही प्रमाणात नुकसान झाले. रब्बीचे बहुतांशी पीक निघाल्यामुळे शेतकऱ्यांचे जास्त नुकसान झालेले नाही. परंतु, कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार जिल्ह्यातील रामटेकमधील २ गावात आणि मौद्यातील ६ गावात अशा दोन्ही ठिकाणच्या ८ गावांतील २२ शेतकऱ्यांच्या सुमारे २१.२ हेक्टरवरील शेती पिकांचे या पावसामुळे नुकसान झाले.

## 'देवेंद्र फडणवीस हकूमशहा' जरांगे पाटील यांचं विधान; म्हणाले, 'गृहमंत्र्यांचा माझ्यावर आणि माझ्या समाजावर...'

■ मुंबई: विशाल कारंडे

मराठा आरक्षणासाठी आंदोलनाचे हत्यार उपसणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी नुकताच एक खळबळजनक दावा केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलत असताना ते म्हणाले की, मराठा हा कधीच जातीयवादी नव्हता. मराठा समाज जातीयवादी असता तर या महाराष्ट्रात सुशीलकुमार शिंदे, वसंतराव नाईक, मनोहर जोशी कधी मुख्यमंत्री होऊ शकले नसते. गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री होऊ शकले नसते. गोपीनाथ मुंडे यांची मुलगी दोनदा खासदार होऊ शकली नसती, पंकजा मुंडे आणि पुतण्या धनंजय मुंडे आमदार होऊ शकले नसते. अशी शेकडो उदाहरणे देता येतील, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले, 'मराठा समाज जातीयवादी असता तर देवेंद्र फडणवीसही मुख्यमंत्री होऊ शकले नसते. मराठा समाज हा भाजपाच्या विरोधात कधीच नव्हता. मराठा समाजानेच तुम्हाला राजसत्तेवर बसवले.'

'पण त्याच राजसत्तेवरून बसून गृहखात्याचा तुम्ही गैरवापर




केला. मराठ्यांच्या मुलांवर केसेस केल्या, एसआयटी नेमून त्रास दिला.' 'माझ्या कुटुंबियांवरही हल्ले करण्याचा डाव आखण्यात आला. ही पद्धत गृहमंत्र्यांना शोभणारी नाही. मी आणि माझे कुटुंब जरी डावावर लागले असले तरी मी सरकारला ऐकणारा नाही. सरकारला माझी निष्ठा विकत घेता येणार नाही.' 'मी समाजासाठी प्रामाणिकपणे काम करत आहे. कोट्यवधी लोकांना आतापर्यंत आरक्षण मिळाले आहे. यापुढे मी धनगर, मुस्लीम यांच्या आरक्षणासाठी प्रयत्न करणार आहे.

## १ जुलै २०२४ रोजी सकाळी अकाऊंट चेक करा, साडेआठ हजार रुपये आलेले असतील; राहुल गांधींचा दावा

■ नवी दिल्ली: प्रगती शर्मा

**लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी सोमवारी मतदान प्रक्रिया पार पडत आहे. एनडीए आणि इंडिया आघाडीकडून जोरदार प्रचार सुरु आहे. त्यातच आता राहुल गांधींनी महिलांसाठीच्या महालक्ष्मी योजनेची माहिती देताना एक दमदार दावा केला आहे.**

राहुल गांधी म्हणतात, १ जुलै २०२४ रोजी सकाळी जेव्हा देशातील महिला आपलं बँक अकाऊंट चेक करतील तेव्हा त्यांच्या खात्यात ८ हजार ५०० रुपये आलेले असतील. देशातील कोट्यवधी गरीब महिलांच्या खात्यात जादूने साडेआठ हजार रुपये येतील.



राहुल गांधी पुढे म्हणतात, जुलैमध्ये पैसे येतील, ऑगस्टमध्ये येतील, सप्टेंबरमध्ये येतील, ऑक्टोबरमध्ये येतील.. वर्षभरात पन्नास हजार नाही, साठ हजार नाही, सत्तर हजार नाही तर तब्बल एक लाख रुपये येतील. देशातल्या कोट्यवधी गोरगरीब महिलांना याचा लाभ मिळेल. खटाखट-खटाखट पैसे पडतील.राहुल गांधींच्या दाव्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे. ४ जून रोजी मतदानाचा निकाल घोषित होणार आहे. जर इंडिया आघाडीला बहुमत मिळालं तर तिथून पुढे शपथविधी, खातेवाटप आणि कामकाज सुरु होण्यासाठी लागणार वेळ. त्यामुळे राहुल गांधी म्हणतात त्याप्रमाणे खरंच १ जुलै २०२४ रोजी महिलांच्या खात्यावर ८ हजार ५०० रुपये येतील का? असा प्रश्न नेटकरी विचारीत आहेत.

## उद्धव ठाकरेच मविआचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार? मुलाखतीत सूचक विधान; म्हणाले, 'मी महाराष्ट्र...'

■ मुंबई: संजीनी खाडे

देशभरात सध्या लोकसभा निवडणुकांसाठी मतदान होत आहे. चौथ्या टप्प्यासाठी १० राज्यांमधील ९६ जागांसाठी आज मतदान होत आहे. त्यात महाराष्ट्रातील ११ जागांचा समावेश आहे. या सर्व पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकांनंतर अवघ्या काही महिन्यांत होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठीही हळूहळू आघाड्यांच्या पातळीवर रणनीती ठरू लागली आहे. मग ती जागावाटपाबाबत असो किंवा मग आघाड्यांच्या बाबतीतील असो. त्यातच आता विधानसभा निवडणुकांच्या संदर्भात उद्धव ठाकरे यांनी सूचक विधान केलं आहे.


विधानसभा निवडणुकांनंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी कोण असेल? यासंदर्भात सध्या बरीच चर्चा पाहायला मिळत आहे. महायुतीकडून यंदाच्या विधानसभा निवडणुका एकनाथ शिंदे यांच्याच नेतृत्वाखाली लढवल्या जातील, असं खुद्द देवेंद्र फडणवीस यांनीच स्पष्ट केलं आहे. मात्र, असं असलं तरी महायुतीला बहुमत मिळाल्यास एकनाथ शिंदेच मुख्यमंत्री असतील, असं स्पष्ट विधान मात्र महायुतीकडून केलं जात नाही. त्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या बाजूला असणाऱ्या महाविकास आघाडीकडून मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण असेल?




यासंदर्भात उद्धव ठाकरेंनी केलेल्या एका विधानावरून अंदाज बांधले जात आहेत. खासदार संजय राऊतांनी 'सामना'साठी उद्धव ठाकरेंची दोन भागांमध्ये मुलाखत घेतली. या मुलाखतीचा दुसरा भाग सोमवारी प्रदर्शित झाला. या भागात बोलताना उद्धव ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारतीय जनता पक्ष, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिंदे गटातील इतर नेते यांच्यावर टीका केली. तसेच, गेल्या काही दिवसांपासून चर्चा असलेल्या पुन्हा भाजपासोबत जाण्याच्या मुद्द्यावरही भाष्य केलं.

'मी महाराष्ट्राच्या अभिमानाचं वेगळं मंदिर बांधतोय. त्यामुळे मला अशा फटींची, खिडक्यांची गरज नाही. ही लढाई जनतेची आहे. नाहीतर हे महाराष्ट्राला खतम करतील', असं उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केलं. त्यामुळे भाजपाकडून ऑफर झाली तरी आता भाजपासोबत जाणार नसल्याची ठाम भूमिका उद्धव ठाकरेंनी आता जाहीर केली आहे.

दरम्यान, भारतीय जनता पक्षानं शिवसेना फोडल्याचा आरोप पुन्हा एकदा करतानाच उद्धव ठाकरेंनी मुंबईतील विकासकामांचा उल्लेख केला. 'कोस्टल रोडचं स्वप्न मी दाखवलं, मुंबई महापालिकेनं ते पूर्ण केलं, त्याचं श्रेयही तुम्ही घेत आहात. (शेष पृष्ठ २ वर)




# केजरीवालांचे आपटबार


आम आदमी पक्षाचे नेते आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल तुरुंगातून हंगामी जामिनावर सुटल्यानंतर निवडणूक प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत आणि लगेचच त्यांनी आपल्या पद्धतीने केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर टीकेचा भडिमार केला. अर्थातच ते अपेक्षितच होते. परंतु तो करताना नेहेमीचे पठडीतले युक्तिवाद न करता त्यांनी थेट भाजपच्या नेतृत्वासंबंधीच प्रश्नचिन्ह लावण्याचा प्रयत्न केला. त्यांनी जे काही आपटबार फोडले, ते फुसके ठरले नाहीत. याचे कारण तसे ते असते तर भाजपच्या वरिष्ठ नेतेमंडळींना सरसावून पुढे येत ताबडतोब त्यावर प्रतिक्रिया देण्याची घाई करावी लागली नसती. भाजपच्या प्रचारमोहिमेचा हुकुमी एक्का म्हणजे नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व आणि ते सतत जाहीर करीत असलेली गॅरंटी. त्यावरच घाव घालण्याच्या उद्देशाने केजरीवाल यांनी मोदींच्या वयाचा उल्लेख करीत भाजपचे सरकार आल्यास वर्षभरातच मोदी निवृत्त होतील आणि अमित शहा यांच्याकडे पंतप्रधानपद येईल, असे सनसनाटी भाकीत केले. तुमचे मत म्हणजे मोदींना मत नव्हे तर शहांना मत, असे त्यांनी मतदारांना उद्देशून सांगितले आहे. याला आधार म्हणून ७५ वर्षांनंतर निवृत्तीचा नियम मोदींनीच तयार केला आहे आणि तो ते स्वतःलाही लागू करतील, असा तर्क केजरीवालांनी




लढवला आहे. यामागचा हेतू अगदी स्पष्ट आहे. एरवी विरोधी छावणीत खळबळ उडवून देण्याची रणनीती मोदी हमखास वापरतात. यावेळी केजरीवालांनी तसेच करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या वक्तव्यानंतर तत्काळ केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा अशा तमाम वरिष्ठ नेतेमंडळींना मोदी हेच पाच वर्षांसाठी पंतप्रधान राहतील, असा निःसंदिग्ध निर्वाळा द्यावा लागला, यावरून ते काही प्रमाणात यशस्वीही झाले. यात केजरीवालांची हतबलताही डोकावते, हे लक्षात घ्यायला हवे. 'तुमचे मत मोदींना' या घोषणेचा मतदारांच्या मनावरील असर गहिरा आहे, हे केजरीवाल यांनी गृहीत धरले आहे, हेही त्यांच्या विधानावरून स्पष्ट होते. तो पुसून टाकणे या निवडणुकीत सहज शक्य नाही, याची अप्रत्यक्ष कबुलीही त्यांच्या वक्तव्यात डोकावते. परंतु या निमित्ताने भारतातील सध्याच्या दोन्ही म्हणजे सत्ताधारी आणि विरोधी आघाडीतील कच्चे दुवे समोर आले. 'इंडिया' आघाडीतील अनेक नेते एकीकडे वातावरण आपल्याला अनकूल आहे, असा दावा करतात; पण सतत मोदी तिसऱ्यांदा सत्तेवर आले तर काय काय प्रतिकूल घडेल, याची मांडणीदेखील करीत असतात. यातून तिसऱ्या वेळीही सत्ताधाऱ्यांची सरशी होण्याची शक्यता आपण पुन्हापुन्हा अप्रत्यक्षरीत्या का होईना व्यक्त करीत आहोत, हे बहुधा त्यांच्या लक्षात येत नाही. दुसरीकडे भाजपची सारी भिस्त एकाच नावावर आहे, हेही पुन्हापुन्हा उघड होत आहे. ज्या तत्परतेने वरिष्ठ नेतेमंडळी एकमुखाने मोदीनामाचा गजर करू लागली, त्यावरून ते स्पष्ट झाले. दुसरे म्हणजे दहा वर्षे केलेल्या कामावर लोक पसंतीची मोहोर उमटवतील, याची भाजपला खात्री असेल तर राजकीय विरोधकांच्या बाबतीत होणाऱ्या तपासयंत्रणांच्या गैरवापराचे काय? तसे करण्याची गरज का वाटते? ऐन निवडणुकीच्या तोंडावर केजरीवाल यांना अटक होते, हा केवळ योगायोग समजणे ही भाबडेपणाची परिसीमा ठरेल. मद्यावरील उत्पादनशुल्क गैरव्यवहारप्रकरणात त्यांना अटक झाली, ती ऐन लोकसभा निवडणुकीची धुमाळी सुरू झाल्यानंतर. सक्तवसुली संचालनालयाने (इडी) त्यांच्यावर तब्बल नऊ समन्स बजावले, त्यातील चार तर एकाच महिन्यात बजावण्यात आलो होते. या गैरव्यवहाराच्या तपासात मूळ गुन्हा दाखल झाल्यानंतर १८ महिन्यांनी त्यातील अरविंद केजरीवाल यांच्या सहभागाची चौकशी सुरू झाली. हा सर्व तपशील तपाससंस्थेने कोणता 'नेम' साधून काम केले आहे, याची कल्पना आणून देणारा आहे.

# २ लाख डॉलर्स घेऊन पळालेल्या आणि एफबीआयला अजूनही न सापडलेल्या हायजॅकरची गोष्ट!!

अमेरिकन गुप्तचर संस्था एफबीआय ही प्रचंड कार्यक्षम यंत्रणा समजली जाते. आजवरच्या इतिहासात त्यांनी कठीणातल्या कठीण केसेस सोडवून दाखवल्या आहेत. पण एक केस मात्र त्यांनाच नाहीतर संपूर्ण अमेरिकेसमोर कोडे बनून राहिली





आहे. असे कोडे जे आजही सुटू शकलेले नाही.

गोष्ट ५० वर्ष जुनी आहे. १९७१ सालची. एक व्यक्ती सुटाबुटात हातात काळ्या रंगाची बॅग घेऊन अमेरिकेच्या एयरपोर्टवर गेला. या इसमाचे नाव डॅन कूपर होते. त्याला डीबी कूपर नावाने देखील ओळखले जायचे. त्याने काउंटरवर जाऊन सियाटलला जाणारी फ्लाईट बोइंग ७२७ चे तिकीट घेतले. त्यानंतर तो विमानात गेला आणि त्याला मिळालेल्या सीटवर जाऊन बसला. पण इतर प्रवाशांप्रमाणे त्याने आपली बॅग वर न ठेवता स्वतःच्या मांडीवर ठेवली. त्याने काळा सूट, स्टायलिश टाय आणि सनग्लासेस घातले होते. उंचापुरा आणि जवळपास चाळीशीतला वाटणारा हा कूपर पुढे काय कांड करणार याबद्दल कुणालाही अंदाज नव्हता.

विमानाने जसे उड्डाण केले तसे कूपरने फ्लाईट अटेंडंट फ्लोरेन्स शाफनरला एक कागद दिला. तिला आधी वाटले हा एखादा बिजनेसमॅन असेल आणि आपला नंबर देत असेल. पण जेव्हा तिने कागद उघडून बघितला तेव्हा तिला मोठा धक्का बसला. कारण त्यात लिहिले होते, 'माझ्याकडे बॉम्ब आहे.' त्याने बॅग उघडून खरोखर त्यात बॉम्ब असल्याचे दाखवले. जराही आगाऊपणा केला तर मला माझे काम करावे लागेल अशी धमकी देखील त्याने दिली.

अतिशय शांत भासणारा कूपर अधूनमधून ड्रिंक्स मागवत होता तसेच त्याला हे ड्रिंक्स पुरवणाऱ्या फ्लाईट अटेंडन्टला टीप देखील देत होता. अधुनमधून तो सिगरेट ओढत होता. पुढे त्याने आपल्या सर्व अटी सांगून जवळच्याच एअरपोर्टवर विमान उतरवून इंधन भरण्यास त्याने सांगितले. त्याला लवकरात लवकर निघायचे होते. त्याने सांगितलेल्या अटीत २ लाख डॉलर्स म्हणजेच १ कोटी ३६ लाख रुपये आणि ४ पॅराशूटची मागणी केली. त्यानंतर ही गोष्ट पायलटच्या कानावर टाकण्यात आली. त्याने ही गोष्ट सियाटलच्या ट्रॅफिक कंट्रोलला सूचना देऊन सांगितली. ही बातमी बाहेर फुटल्यावर मात्र प्रचंड मोठा गोंधळ सुरू झाला. एफबीआयला ही गोष्ट समजल्यावर एफबीआय देखील कामाला लागली. पण सरकारने विमानात असलेल्या लोकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत कूपरच्या सर्व मागण्या मान्य केल्या. एफबीआयने आता एक युक्ती केली. त्यांनी कूपरला देण्यात येणाऱ्या पैशांचा नंबर लिहून घेतला.

कूपरचे खरे मिशन तर यानंतर सुरू झाले. त्याने पायलटला सांगितले की, विमानाला मेक्सिकोला घेऊन चला. विमानात त्याने फक्त पायलट आणि इतर स्टाफ राहू दिला. प्रवाशांना त्याने उतरू दिले. त्याला विमानासंबंधी चांगलीच माहिती आहे हे स्पष्ट दिसत होते. अमेरिकेने कूपरला पकडण्यासाठी त्या विमानाच्या मागोमाग दोन विमाने पाठवली. कूपरने सगळ्या पायलट्सना एका रुममध्ये जाण्यास सांगितले आणि दरवाजा आतून बंद करावा असे निर्देश दिले. काहीच काळानंतर त्या पायलट्सना हवेच्या दबावात फरक दिसला. पायलट बाहेर येऊन बघते तर विमानाचा दरवाजा उघडा होता. विमान एयरपोर्टवर उतरले तेव्हा विमानाला चारही बाजूने घेरण्यात आले. पण ज्याला पकडण्यासाठी एवढे प्रयत्न केले तो तर आधीच उडून गेला होता. तेव्हापासून आजवर त्याचा पत्ता कुणालाही लागलेला नाही.

अमेरिकन व्यवस्थेसाठी हा प्रतिष्ठेचा मुद्दा होऊन बसला होता. त्याचा छडा लावण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न एफबीआयने केले. कूपरला दिलेल्या पैशांचे नंबर हाती असल्याने ह्या नंबरच्या नोटा कुठे आढळल्यास आणून देण्याची घोषणा करण्यात आली. त्यासाठी बक्षीसही जाहीर करण्यात आले. पण काहीच उपयोग झालां नाही. डॅन कूपर नावाच्या अनेक लोकांना त्यांनी चौकशीला बोलावले. पण मुळात त्याचे नाव डॅन कूपर नव्हते.

युरिक उलीस नावाचा एक गृहस्थ डीबी कूपर केसमध्ये आपलं पूर्ण आयुष्य खपवत आहे. एफबीआयची हजारो कागदपत्रे अनेक दशकांपासून तो चाळत आलाय. युरिकने या केसला ४७ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कॉन्फरन्स आयोजित केली होती. त्यात त्याने असा दावा केला की डीबी कूपरचे खरे नाव शेरीडन पीटरसन आहे.

युरिकच्या मते पीटरसन कधीकाळी सैन्यात असल्याने त्याला विमान हायजॅकिंग तसेच स्काय डायव्हिंगची चांगली माहिती होती. त्याने पुढे सांगितले, की तो १९७१ साली नेपाळमध्ये राहत होता. नंतर त्याने रशिया, जपान, हॉंगकॉंग, चीन यासारख्या देशांचा देखील फेरफटका मारला, तर १९९९ साली तो अमेरिकेत परतला होता. पण हा पीटरसन देखील तोच आहे का याबद्दल एफबीआय साशंक होती. कारण स्वतः पीटरसन आज नव्वदीत असून कॅलिफोनिऱ्यात राहत आहे.



(कूपरची टाय क्लिप)






युरिकने नुकतेच डीबी कूपर द डेफिनेटीव इन्वेस्टीगेशन ऑफ शेरीडन पीटरसन या नावाने शोधनिबंध प्रसिद्ध केला आहे. यावरून एक गोष्ट समजते ती म्हणजे या युरिकराला या घटनेची चांगलीच पाळेमुळे माहीत आहेत.


एफबीआय आजवर पीटरसनला दोषी ठरवू शकली नाही आणि त्यांचा संशयही कमी झाला नाही. या दरम्यान कित्येक लोकांवर नाव साधर्म्यामुळे किंवा इतर गोष्टींमुळे शंका घेण्यात आली, पण कधीही एका निष्कर्षापर्यंत त्यांना पोहोचता आले नाही. शेवटी २०१६ साली एफबीआयने आपण या केसचा तपास सोडून दिला आहे असे घोषित केले. एक व्यक्ती ५० वर्षे जगातल्या एका मोठ्या तपाससंस्थेला सापडत नाही ही गोष्ट मोठी आश्चर्याची आहे. त्यामुळे एफबीआय सारख्या नामांकित संस्थेलाही कोणीतरी सव्वाशेर सापडू शकतो हे कळून येते.

# हनुमान आजही जिवंत आहेत?

भगवान हनुमान ज्यांची शक्ती अफाट होती, रामायण काळातही हनुमानजींनी आपली शक्ती सर्वोच्च पातळीवर नेली नाही कारण असे झाले असते तर लंका काही क्षणात नष्ट झाली असती. हनुमानजींना अमरत्वाचे वरदान मिळाले होते आणि ते कलियुगाच्या शेवटपर्यंत पृथ्वीवर राहतील, हनुमानजी जिवंत असल्याचा पुरावा देखील अनेक ठिकाणी पाहायला मिळतो,

रामायणानंतर हनुमानजी कुठे गेले हा प्रश्न सर्वांनाच आहे पण ते आहेत हेच अंतिम सत्य आहे कारण ते चिरंजीव आहेत. रामायणात असेही सांगण्यात आले आहे की, श्री राम पृथ्वी सोडून जाईपर्यंत हनुमानजी अयोध्येत त्यांची सेवा करत राहिले आणि त्यानंतर त्यांनी जंगलाला आपले निवासस्थान बनवले, त्यानंतर त्रेतायुग संपला आणि द्वापर युग सुरू झाले. द्वापर युगात हनुमानजींचा उल्लेख दोनदा आला आहे, पहिल्यांदा भीम जंगलात असताना त्याला एक म्हातारा वानर सापडला, म्हणाला मी उठणार नाही, तूच मला मार्गातून दूर कर, यानंतर गर्विष्ठ झालेल्या भीमाने सर्वतोपरी प्रयत्न केले. पण त्याला त्या माकडाची शेपटीही हलवता आली नाही, तेव्हा भीमाला समजले की तो सामान्य वानर नसून स्वतः हनुमान आहे. जो भीमाला अभिमान सोडण्याचा धडा द्यायला आला होता.

यानंतरही संपूर्ण महाभारत यु-द्धात हनुमानजी अर्जुनासोबत रथावर ध्वजाच्या रूपात राहिले, शेवटी हनुमान जी त्यांच्या मूळ रूपात आले आणि तेथून निघून गेले तेव्हा तो रथही भ'स्मसात झाला. अर्जुनाने श्रीकृष्णाला याचे कारण विचारले असता श्रीकृष्णाने सांगितले की ते हनुमानजी होते, त्यामुळे त्यांच्या रथाला काहीही झाले नाही, नाहीतर इतक्या वि'ध्वंसक अ'स्त्रांसमोर त्यांचा रथ कधीच उभा राहू शकला नाही, अशा प्रकारे



महाभारत काळात हनुमानजींचीही नोंद झाली.

कलियुगात हनुमानजींच्या कथा ऐकायला मिळतील, इंडोनेशिया कंबोडियामध्येही वेगवेगळ्या नावाने हनुमानजींच्या कथा ऐकायला मिळतील. आफ्रिकेपासून अमेरिकेपर्यंत आजही बलाढ्य वानर जिवंत असल्याची चर्चा आहे. १४ व्या शतकात, ऋषी मध्वाचार्य यांनी हनुमानजींना भेटल्याबद्दल सांगितले.

१३ व्या शतकात तुलसीदासजींनी देखील सांगितले की हनुमानजींनी त्यांना रामचरितमानस लिहिण्यासाठी प्रेरित केले होते. त्यानंतरही अनेक ऋषींनी हनुमानजींना भेटल्याचा किंवा पाहिल्याचा दावा केला. जगभरात अशी अनेक ठिकाणे आहेत जिथे अशा पावलांचे ठसे बनवले जातात, जे पाहिल्यानंतर असे समजते की असा एक जीव आहे ज्याचा आकार खूप मोठा आहे, जगभरातील वेगवेगळ्या देशांमध्ये हे पायांचे ठसे सापडले आहेत.

शास्त्रज्ञांचा असा दावा आहे की ही खूण अशाच काही प्राण्याचे आहे ज्यांचे शरीर खूप मोठे असावे, असे म्हटले जाते की जेव्हा भगवान रामाने आपले मानवी शरीर सोडले तेव्हा हनुमान अयोध्या सोडून श्रीलंकेच्या जंगलात रामाच्या स्मरणार्थ पिदारू पर्वतावर गेले. येथील लोकांनी हनुमानजींची खूप सेवा केली, त्यांच्या भक्ती आणि सेवेवर आनंदित होऊन, त्यांनी त्यांना वचन दिले की ते प्रत्येक ४१ वर्षांनी त्यांच्या कुळात राहायला येतील. तसेच तुम्ही कोणत्याही हनुमान मंदिरात जा तिथे आसपास तुम्हाला वानर आढळतील हे नक्की, श्रद्धेनुसार हेच खरं आहे की भगवान हनुमान आजही आपल्यात आहेत.

पान १ वरुन...

## 'कॉँग्रेसवाले खूप घाबरलेत,...

पंतप्रधान मोदी म्हणाले, मला माहिती आहे की आपल्या देशाला कॉँग्रेसचं कमकुवत, भित्रं आणि अस्थिर सरकार अजिबात नको आहे. आपल्याला आपल्या परिसरात कमकुवत पोलीस किंवा कमकुवत शिक्षक कधीच नको असतो. त्याचप्रमाणे कमकुवत पंतप्रधान निवडून कसं चालेल? आपल्याला आपल्या परिसरातला पोलीस असो, शिक्षक असो किंवा देशाचा पंतप्रधान असो, तो मजबूतच हवा असतो. भित्रा पंतप्रधान कसा चालेल? हे कॉँग्रेसवाले खूप घाबरलेले आहेत. हे लोक इतके घाबरलेत की यांना रात्री स्वप्नातही पाकिस्तानचा अणूबॉम्ब दिसतो. कॉँग्रेस सारखे हे पक्ष आणि त्यांच्या नेत्यांना रात्री झोपेतही पाकिस्तानचा अणूबॉम्ब दिसतो. या कॉँग्रेसवाल्या लोकांची, इंडिया आघाडीतल्या नेत्यांची अलीकडच्या काळातील वक्तव्ये ऐकली तरी हसू येतं, तसेच हे लोक किती भित्रे आहेत ते समजतं.

## अजित पवारांना शरद...

अजित पवार यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या आरोपांवर देवेंद्र फडणवीस म्हणाले, २००९ ते २०१२ पर्यंत मी अजित पवार यांच्यावर आरोप करत आलो. त्यावेळी ते मंत्री होते. मी केलेल्या आरोपांची चौकशी करण्यात आली. तपासात मी केलेले आरोप खरे असल्याचे समोर आले. त्यानंतर भ्रष्टाचार करणाऱ्या अनेक अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले. अनेकांना बडतर्फ करण्यात आले, अनेकांना शिक्षा झाली. अजित पवार हे त्या विभागाचे प्रमुख होते. परंतु या संपूर्ण तपासात त्याचा थेट संबंध आढळून आला नाही. त्यामुळे त्याचे नाव आरोपपत्रात आले नाही. अजित पवार आता आमच्यासोबत आले आहेत, परंतु या प्रकरणाचा तपास २०१२ मध्ये झाला होता.

पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात मागील दोन निवडणुकीपेक्षा जास्त प्रचारसभा घेत आहेत. त्यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आता प्रचाराला वेळ चांगला मिळला आहे. यामुळे सभाची संख्या वाढली आहे. तसेच मागील वर्षी शिवसेना एक होती. आता शिवसेना एकनाथ शिंदे यांची आणि उद्धव ठाकरे यांची झाली आहे. यामुळे मते विभागली जाणार आहेत.

## अरविंद केजरीवाल...

यानंतर केजरीवाल यांना मुख्यमंत्री पदावरून हटवण्यात यावे, अशी याचिका दिल्ली उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. दिल्ली उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. यानंतर सर्वोच्च न्यायालयात केजरीवाल यांना मुख्यमंत्री पदावरून हटवण्यात यावे, यासाठी याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. तसेच दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. त्यामुळे अरविंद केजरीवाल यांच्यासाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे.

दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी आतापर्यंत आम आदमी पक्षाच्या काही नेत्यांना अटक झालेली आहे. यामध्ये आपचे नेते, दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया हे अद्यापही तुरुंगात आहेत. खासदार संजय सिंह यांच्यावरही कारवाई झालेली आहे. तसेच बीआरएसच्या नेत्या के कविता यांनाही या प्रकरणात अटक झाली असून त्याही तुरुंगात आहेत. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही अटक झाली. सध्या ते अंतरिम जामीनावर बाहेर आहेत. मात्र, दिल्ली मद्य धोरण घोटाळा प्रकरणात मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप असून यातील काही पैसे गोवा विधानसभेच्या निवडणुकीत वापरले असल्याचा आरोप आहे. या सर्व प्रकरणाचा तपास सध्या ईडीकडून सुरू आहे. तर हे सर्व आरोप आम आदमी पक्षाच्यावतीने फेटाळून लावण्यात आलेले आहेत.

## उद्धव ठाकरेच मविआचे...

कंत्राटदारांसाठी जवळपास एक लाख कोटींच्या कामांना त्यांनी मान्यता दिली आहे. ९० हजार कोटी जाऊन पुन्हा त्यावर १० हजार कोटी चढले. मग मुंबईच्या सफाई कामगारांना तुम्ही पगार कुठून देणार? हे सगळं करण्यासाठीच त्यांनी शिवसेना फोडली', असं उद्धव ठाकरे म्हणाले.

यावेळी बोलताना उद्धव ठाकरेंनी सत्ता आल्यावर आपण पुन्हा मुंबई आणि महाराष्ट्राचं गेलेलं वैभव मिळवून देऊ, अशा आशयाचं विधान केल्यामुळे त्यांच्या मुख्यमंत्रीपदाबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत. 'लोकांच्या आशीर्वादाने पुन्हा सरकार येणार. आधी केंद्रात आणि मग राज्यात येणार. मी महाराष्ट्र आणि मुंबईचं लुटलेलं वैभव परत आणेन. आर्थिक केंद्रही मी नव्याने उभारून दाखवेन', असं उद्धव ठाकरे म्हणाले. तसेच, 'भाजपाच्या मशीनला ज्या शिवसेनेनं करंट दिला, तो करंटच काढला तर वॉशिंग मशीन काय चालणार?' असा टोलाही त्यांनी लगावला.

## आईच मुलाला ड्रग्स देऊन म्हणायची 'जा चोऱ्या करून ये!' कित्येकदा अटक झाली, सुटताच...

■ मुंबई: विशेष प्रतिनिधी

मुंबई पोलिसांनी एका अट्टल चोराला अटक केली आहे. त्याने मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी चोरी केल्या आहेत. पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याची चौकशी केली असता काही धक्कादायक बाबी उघड झाल्या. चोरी करण्यासाठी घराबाहेर पडत असताना त्याची आईच त्याला ड्रग्जचं सेवन करायला लावत असे असं पोलीस तपासात उघड झालं आहे. यानंतर पोलीसही चक्रावले आहेत. चोराची ओळख पटली असून कृष्ण रवी महेसकर असं त्याचं नाव आहे. २४ वर्षीय रवीविरोधात मुंबईतील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात घरफोडीचे एकूण २२ गुन्हे दाखल आहेत अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. काळाचौकी पोलिसांनी आरोपीवर अटकेची कारवाई केली आहे. काळाचौकी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, '२४ वर्षीय रवी महेसकर हा नियमत गुन्हेगार आहे. त्याच्या सर्व गुन्हेगारी कारवायांमध्ये त्याची आई विजेता महेसकर (५०) हिने



महत्त्वाची भूमिका बजावली होती. घरफोडीसाठी बाहेर पाठवण्यापूर्वी ती त्याला ड्रग्ज देत असे. तसंच चोरीच्या मालमत्तेची विल्हेवाट लावत असे'. पोलिसांनी अद्याप आरोपीच्या आईला अटक केलेली नाही. ती सध्या फरार आहे.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# नागरिकांच्या आरोग्याशी खेळ! रद्दी कागदात खाद्यापदार्थ बांधून देण्यावरील पालिकेच्या बंदी आदेशास हरताळ

■ मुंबई: यश सावंत

**मानखुर्दमध्ये रस्त्यावर कोंबडीचे मांस शिवजून तयार केलेला शॉर्मा खाल्ल्यामुळे १५ जणांना विषबाधा झाली. त्यापैकी एकाचा मृत्यू झाल्याच्या घटनेमुळे खळबळ उडाली. या घटनेमुळे रस्त्यावर शिजवून विक्री करण्यात येणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**

शिवाय मुंबई महापालिकेने रद्दी कागदात खाद्यापदार्थ बांधून देण्यावर बंदी घातली असतानाही फेरीवाल्यांनी त्याला हरताळ फासला आहे.

मुंबईमधील अनेक भागांमध्ये रस्त्यावर वडापाव, भजी, समोसा, मसाला डोसा, इडली, रगडा पॅटीस, भेळ, चायनीज पदार्थ यांसह भाजी, पोळी, भात, डाळ अशी जेवणाची थाळी आदी पदार्थांची विक्री करण्यात येते. हे खाद्यापदार्थ रस्त्यावरच शिजविण्यात येतात आणि त्यांची विक्री करण्यात येते. मात्र पदार्थ बनविण्यासाठी वापरण्यात येणारा कच्चा माल, तेल आदींच्या, तसेच शिवजवेल्या अन्नपदार्थांच्या दर्जाची तपासणीच होत नाही. गेल्या काही वर्षांमध्ये मुंबईत खाद्यापदार्थांची विक्री होत असलेल्या अनेक खाऊ गल्ल्या निर्माण झाल्या आहेत. अनेक मंडळी हॉटेलमध्ये जाणे परवडत नसल्यामुळे या खाऊ गल्ल्यांमध्ये स्वस्तात मिळणारे पदार्थ खावून आपली भूक भागवतात. मात्र या अन्नपदार्थांमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे. पावसाळा जवळ आल्यानंतर जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव होवू नये यासाठी महापालिका रस्त्यांवरील



सरबतवाले, फळांच्या रसाची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करते. मात्र रस्त्यावर शिजवलेल्या अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्यांकडे काणाडोळा झाला आहे. त्यामुळेच रस्त्यावर खाद्यापदार्थांची विक्री करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. वर्तमानपत्राची शाई आरोग्यासाठी घातक आहे. ही शाई पोटात गेल्यास दुर्धर असे आजार होवू शकतात. त्यामुळे काही वर्षांपूर्वी मुंबई महानगरपालिकेने वर्तमानपत्रामध्ये खाद्यापदार्थ बांधून देवू नये असे आदेश जारी केले आहेत. मात्र हे आदेश कागदावरच राहिले आहेत. मुंबईतील अनेक फेरीवाले खाद्यापदार्थ वर्तमानपत्रातच बांधून देत आहेत. वर्तमानपत्रात बांधून दिलेल्या खाद्यापदार्थांना शाई लागते. ही शाई पोटात गेल्यास त्यातील विरेचकांमुळे मूत्रपिंड, यकृत यासारख्या महत्त्वाच्या अवयवांवर घातक परिणाम होण्याची शक्यता असते. शाईमधील रोधक पदार्थ आरोग्यास हानिकारक असतात. हे खाद्यापदार्थ नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण करत आहेत. खाद्यापदार्थ वर्तमानपत्रात बांधून देणाऱ्या फेरीवाल्यांवर पालिकेचा अंकुश नाही. यासंदर्भात तपासणीच होत नाही. त्यामुळे फेरीवाल्यांचे फावत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

'रस्त्यावरील उघडे, शिळे अन्न खाणे टाळा' खाद्यापदार्थ निकृष्ट दर्जाचे, बरेचदा शिळे व योग्य पध्दतीने साठवलेले नसल्याचे निदर्शनास येते. त्यातही उन्हाळ्यातील वाढत्या तापमानामुळे खाद्यापदार्थ लवकर खराब होतात. खराब व निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांच्या सेवनामुळे अन्न विषबाधा सारख्या आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात.

# शिवडी-वरळी उन्नत रस्त्याचे ६५ टक्के काम पूर्ण, पुनर्वसनाचा प्रश्न लवकरच निकाली काढला जाणार

■ मुंबई: रघुवीर जाधव

शिवडी- वरळी जोडरस्त्याचे आतापर्यंत ६५ टक्के काम पूर्ण झाले असून हा जोडरस्ता २०२५ अखेर पूर्ण करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) नियोजन आहे. त्यामुळे आता या प्रकल्पातील रखडलेल्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी एमएमआरडीएने ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार जोडरस्त्याच्या संरेखनात काहीसा बदल करत पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावता येतो याची चाचपणी सध्या एमएमआरडीएकडून सुरु आहे. मुंबई आणि नवी मुंबई अंतर कमी करण्यासाठी एमएमआरडीएकडून शिवडी ते न्हावाशेवा सागरी सेतू बांधण्यात आला आहे. हा सेतू जानेवारी पासून वाहतूक सेवेत दाखल झाला आहे. असे असताना दक्षिण मुंबईतुन या सेतूवर अतिवेगाने जाण्यासाठी मात्र प्रवाशांना आजही प्रतीक्षा करावी लागत आहे. कारण दक्षिण मुंबईवरून या




सागरी सेतूवर पोहचणे सोपे व्हावे यासाठी बांधण्यात येत असलेल्या ४.५ किमीच्या शिवडी ते वरळी उन्नत रस्त्याचे काम अद्याप ही पूर्ण झालेले नाही. त्यासाठी २०२५ पर्यंत वाट पाहावी लागण्याची शक्यता आहे. कारण या प्रकल्पाचे आतापर्यंत केवळ ६५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम पूर्ण होण्यास डिसेंबर २०२५ उजाडण्याची शक्यता आहे. दरम्यान या प्रकल्पात प्रभादेवी येथील पुनर्वसनाचा प्रश्न सुटत नसल्याने प्रकल्पास विलंब होत आहे. त्यामुळे आता हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याची माहिती एमएमआरडीएतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

उन्नत रस्ता प्रकल्पासाठी ८५० झोपडयांसह १९ इमारती बाधित होत आहेत. ८५० झोपडया हटवल्या असल्या तरी प्रभादेवी येथील १९ इमारतींचे पुनर्वसन होणे बाकी आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी रस्त्याच्या संरेखनात काही बदल करता येऊ शकतो का यावर अभ्यास सुरू असल्याचेही या अधिकाऱ्याने सांगितले.

# पाऊस, अपघातांमुळे मुंबईतील वाहतुकीवर परिणाम

■ मुंबई: सचिन कदम

मुंबई: वादळी वारे, पाऊस व ठिकठिकाणी झालेल्या अपघातांमुळे मुंबईतील वाहतुकीवर सोमवारी सायंकाळी परिणाम झाला. पूर्व उपनगर, दादर, भायखळा, ट्रॉम्बे, वडाळा, जोगेश्वरी परिसरात वाहतूक कोंडी झाली.

मुंबईत अचानक जोरदार वारा, धूळ व पावसामुळे अनेक ठिकाणी अपघात झाले. वडाळा पूर्व येथील बरकत अली नाका परिसरातील बांधकाम सुरू असलेल्या इमारतीवरील लोखंडी भाग कोसळल्यामुळे ८ ते १० गाड्यांचे नुकसान झाले. या परिसरातली वाहतूक पूर्णपण ठप्प झाली होती. बरकत अली जंक्शन, पूजा जंक्शन येथील वडाळ्यावरून उत्तरेकडे जाणारी वाहतुकीसंथ गतीने सुरू होती. पूर्व उपनगरातून घाटकोपर व ठाण्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना एक ते दीड तास अधिक कालावधी लागत होता. वडाळा पुलावरील वाहतूकही दुसऱ्या मार्गिकेवर वळवण्यात आली. घाटकोपर छेडा नगर येथे १२० बाय १२० फुटांचा जाहिरात फलक सोमवारी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास जवळील पेट्रोल पंपावर कोसळला. पूर्व उपनगरात अनेक ठिकाणी वाहतूक संथ गतीने सुरू होती. याशिवाय दादर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावर टेम्पोमध्ये



बिघाड झाल्यामुळे दादर ते भायखळा येथील उत्तर वाहिनीवरील वाहतूक संथ गतीने सुरू होती. तसेच ट्रॉम्बे येथील फ्रीवे टनल येथे अपघात झाला. त्यामुळे ट्रॉम्बे येथून दक्षिणेकडे जाणाऱ्या मार्गिकेवरील वाहतूक प्रभावीत झाली होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. याशिवाय पश्चिम उपनगरात काही ठिकाणी वाहने बंद पडल्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला होता. शिवाजी पार्क परिसरातही धुळीमुळे दुचाकीस्वारांची तारांबळ उडाली. शहरात अनेक ठिकाणी वाहतूक इतर मार्गांवर वळवण्यात आली होती. वाहतूक पोलिसांकडे वाहतूक कोंडीच्या अनेक तक्रारी दाखल झाल्या असून त्या तत्काळ सोडवण्यासाठी प्रयत्न करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. दादर परिसरात धुळीचं वादळ आल्याने वातावर काहीसं धुरकट झाल्याचं दिसतंय. या ठिकाणी वाऱ्याचा वेग वाढल्याने पावसालाही सुरूवात सुरू आहे. पुढच्या तीन ते चार तासांमध्ये जोरदार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**मुंबई विमानतळाचं रनवे बंद**

पाऊस, वादळी वारे यामुळे मुंबई विमानतळाचा रनवे बंद करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक फ्लाईट्स दुसरीकडे वळवण्यात आल्या आहेत.

**पूर्व द्रुतगती मार्गावर झाडं कोसळली**

जोरदार पावसामुळे पूर्व द्रुतगती मार्गावर झाडं कोसळली. जोरदार पाऊस, वादळी वाऱ्याचा मुंबईला मोठा फटका बसल्याचं दिसतंय. जागोजागी झाडं कोसळल्यामुळे वाहतूक व्यवस्था खोळंबल्याचं दिसून आलंय.

**कोस्टल रोडवर मुसळधार पाऊस**

मुंबईतील कोस्टल रोडवर मुसळधार पावसाला सुरूवात झाल्याची माहिती आहे. ठाणे शहरात मोठ्या प्रमाणात ढगाळ वातावरण निर्माण झालं असून डोंबिवली, बदलापूरसह इतर ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यासह रिमझिम पावसाच्या सरी बरसत आहेत.

# गोरेगाव-मुलुंड जोड रस्त्याच्या रुंदीकरणाचा मार्ग उच्च न्यायालयाकडून मोकळा, भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करण्याची मागणी फेटाळली

■ मुंबई: संजीनी खाडे

मुलुंड, भांडुप आणि कांजूरमार्ग येथील ७८२ एकर मिठागरांच्या जमिनीचा भाडेपट्टा रद्द करण्याचा निर्णय उच्च



न्यायालयाने कायम ठेवताना जमिनीचा ताबा मीठ आयुक्तांकडे सोपवण्याचे आदेश पट्टेदाराला दिले आहेत. विशेष म्हणजे न्यायालयाच्या या निर्णयामुळे गोरेगाव – मुलुंड जोड रस्त्याच्या रुंदीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. या जमिनीबाबतच्या पूर्वीच्या कार्यवाहीतील अंतरिम आदेशामुळे प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेली जमीन मुंबई महानगरपालिका ताब्यात घेऊ शकली नव्हती. परंतु, प्रकल्पासाठीची संबंधित जमीन महापालिकेने योग्य त्या कायदेशीर प्रक्रियेद्वारे ताब्यात घ्यावी, असे आदेश न्यायालयाने महापालिका आयुक्तांना दिले आहेत. मुंबईसारख्या शहरात एकीकडे जमिनीच्या किमती देशात सर्वाधिक आहेत, तिथे ७८२ एकर जमीन मीठ उत्पादनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही वापरासाठी देऊन जमिनीवरील हक्काचा वाद निर्माण केला जाऊ शकत नाही, असेही न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या एकलपीठाने उपरोक्त आदेश देताना स्पष्ट केले. मिठागरांच्या या जमिनीचा भाडेपट्टा निव्वळ मीठ निर्मितीसाठी देण्यात आला होता, घरबांधणी किंवा कारखान्यासाठी नाही.

# थकबाकीदारांच्या जप्त वस्तूंच्या लिलावाच्या प्रक्रियेस वेग द्यावा, महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांचे आदेश

■ मुंबई: माधव अलवा

वर्षानुवर्ष कर न भरणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांना जप्ती व अटकावणीची नोटीस दिलेल्या मालमत्तेवर महानगरपालिका तरतुदीनुसार कलम २०५ नुसार जप्ती व अटकावणी करावी. मालमत्ताकराची वसुली न झाल्यास जप्त केलेल्या वस्तूंचा जाहीर लिलाव करण्याच्या प्रक्रियेस वेग द्यावा, त्यानंतर मालमत्तेची लिलावाद्वारे विक्री करण्याची कार्यवाही सुरू करावी, असे आदेश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी शुक्रवारी दिले. दरम्यान, करवाढीचा नवीन स्त्रोत शोधण्याकरीता २४ विभागातील मालमत्तांचे स्थळनिरीक्षण करून त्यातील बदलानुसार करनिर्धारणात सुधारणा करावी, असेही गगराणी यांनी सांगितले. मालमत्ता कर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्त्रोत आहे. मालमत्ता कर नागरिकांनी वेळेत पालिकेकडे जमा करावा, यासाठी भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका




आयुक्त अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली करनिर्धारण व संकलन खात्यामार्फत सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. यासंदर्भात महानगरपालिका मुख्यालयात शुक्रवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. करनिर्धारण व संकलन विभागातर्फे २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाची सुधारित मालमत्ता कर देयके फेब्रुवारी अखेरीस संबंधितांना पाठविण्यात आली असून २५ मेपर्यंत कर भरण्याबाबत नागरिकांना सातत्याने आवाहन करण्यात येत आहे. करसंकलनाचे २०२३ -२४ चे निर्धारित उद्दिष्ट ४ हजार ५०० कोटी रूपयांचे असून ९ मेपर्यंत ३ हजार ९०५ कोटी रूपयांचे कर संकलन झाले आहे. उर्वरित १५ दिवसात ५९५ कोटी रूपयांचा मालमत्ताकर संकलनाचे लक्ष्य आहे. त्यादृष्टीने बैठकीत चर्चा करण्यात आली. मुंबई शहर आणि उपनगरांमधील मोठ्या थकबाकीदारांवर लक्ष केंद्रित करावे. तसेच, मागील थकबाकी वसुलीसाठी आणखी परिश्रम घेण्यात यावे. असे गगराणी यांनी बैठकीत सांगितले. यावेळी अश्विनी जोशी, सहआयुक्त सुनील धामणे, सहआयुक्त चंद्रशेखर चोरे, सहायक आयुक्त महेश पाटील यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. सातत्याने आवाहन आणि पाठपुरावा करूनही मालमत्ता कराचा भरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या तीन मालमत्ताधारकांवर महानगरपालिकेतर्फे जप्ती आणि अटकावणीची कारवाई करण्यात आली.

# ना. म. जोशी मार्ग बीडीडी चाळ पुनर्विकास: रहिवाशांच्या अनुपस्थितीमुळे सोडत रद्द

■ मुंबई: सम्यक कासारे

ना. म. जोशी मार्ग बीडीडी चाळीतील ३०५ रहिवाशांना बीडीडी चाळ पुनर्विकासाअंतर्गत शुक्रवारी पुनर्वसित इमारतीतील हक्काच्या घराची हमी देण्यासाठी म्हाडाच्या मुंबई मंडळाने शुक्रवारी



सोडत काढण्याचा निर्णय घेतला होता. मात्र या सोडतीला रहिवाशीच उपस्थित न राहिले नाहीत. त्यामुळे सोडत रद्द करण्याची नामुष्की मुंबई मंडळावर ओढवली. आता मंगळवार, १४ मे रोजी ही सोडत काढण्यात येणार आहे. या सोडतीद्वारे रहिवाशांना कोणत्या पुनर्वसित इमारतीत आणि कोणत्या मजल्या, किती क्रमांकाचे घर मिळणार हे निश्चित करण्यात येणार आहे.

वरळी, ना. म.जोशी मार्ग आणि नायगाव या तीन बीडीडी चाळींचा पुनर्विकास म्हाडाचे मुंबई मंडळ करीत आहे. या तिन्ही चाळींतील रहिवाशांची पात्रता निश्चिती करून रहिवाशांना म्हाडाच्या संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्यात येत आहे. आतापर्यंत या तिन्ही चाळींतील अनेक रहिवाशांची पात्रता निश्चिती करून त्यांना सोडतीद्वारे घराची हमी देत त्यांचा संक्रमण शिबिरात हलविण्यात आले आहे. आता ना. म. जोशी मार्ग येथील इमारत क्रमांक ७, ८, ९ आणि १० मधील ३०५ रहिवाशांना घराची हमी देण्यासाठी शुक्रवारी मुंबई मंडळाने सोडत काढण्याची तयारी केली होती.

# अडचणीच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मदत केल्यानेच पक्षप्रवेश, रवींद्र वायकर यांची सारवासारव

■ मुंबई: नितीन देवळेकर

आपल्याला चुकीच्या प्रकरणात गोवण्यात आले. त्यानंतर तुरुंगात जाणे किंवा पक्ष बदलणे हे दोनच पर्याय उरले होते. जड अंत:करणानेच आपण पक्ष बदलला, अशा कबुलीनंतर वायव्य मुंबई लोकसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र वायकर यांनी शुक्रवारी वेगळी भूमिका मांडली. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे आपल्यामागे उभे राहिले नाहीत. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तत्काळ मदत केल्यानेच आपण पक्षप्रवेश केल्याचे वायकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. माझ्यावरील सर्व आरोप खोटे असतानाही सक्तवसुली संचालनालयाची नोटीस आली. आपण चौकशीला सामोरे गेलो. या काळात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे माझ्या मागे उभे राहिले नाहीत. मी प्रचंड दबावाखाली होतो. तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटलो. त्यांनी माझी




बाजू समजावून घेतली आणि मला पाठिंबा देत न्याय दिला. अडचणीच्या काळात ज्यांनी मला मदत केली, त्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिंदे गटात प्रवेश केला, अशी भूमिका वायकर यांनी मांडली. आपल्या मुलाखतीचा विपर्यास केला, असा दावाही त्यांनी केला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मी तीनदा भेटलो. एकदा ते माझ्या घरी आले. यातून मार्ग काढा. माझ्यावरील आरोप खोटे आहेत. जे चालले आहे, ते चुकीचे आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांना फोन करून सांगा, अशी विनंती मी केली होती. त्यावर त्यांनी मी काहीही करू शकत नाही. तुम्हाला सामोरे जावे लागेल, असे ठाकरे यांनी सांगितले.

# विद्यावेतनाच्या प्रश्नावर डॉक्टर आंदोलनाच्या पवित्र्यात, पाठपुरावा करूनही प्रशासनाचे दुर्लक्ष

■ मुंबई: प्रतिनिधी

मुंबई महानगरपालिकेची केईएम, शीव, नायर आणि कूपर वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये आंतरवासिता करणाऱ्या ८०३ डॉक्टरांना राज्य सरकारने निश्चित केलेल्या विद्यावेतनापेक्षा कमी वेतन दिले जात आहे. त्यामुळे या डॉक्टरांना शिक्षण घेताना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. पूर्ण विद्यावेतन मिळावे यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. त्यामुळे याबाबत योग्य निर्णय न घेतल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशारा डॉक्टरांनी दिला आहे. राज्य सरकारच्या आदेशानुसार वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आंतरवासिता करणाऱ्या डॉक्टरांना दरमहा १८ हजार रुपये विद्यावेतन देण्यात येणे बंधनकारक आहे. त्यानुसार राज्य सरकारच्या सर्व वैद्यकीय



महाविद्यालयांमध्ये आंतरवासिता करणाऱ्या डॉक्टारांना १८ हजार रुपये विद्यावेतन मिळते. मात्र मुंबई महानगरपालिकेच्या चार वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये या नियमाची अद्याप अमलबजावणी करण्यात आलेली नाही. महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयात आंतरवासिता करणाऱ्या ८०३ डॉक्टरांना फक्त ११ हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांना राज्य सरकारच्या नियमानुसार विद्यावेतन मिळावे यासाठी मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. मात्र त्याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, असा आरोप डॉक्टरांनी केला आहे. प्रशासनाच्या आडमुठ्या भूमिकेमुळे डॉक्टरांचे मोठे नुकसान होत असून, त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. राज्य सरकारच्या वैद्यकीय महाविद्यालयात आणि मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये आतंरवासिता करणारे डॉक्टर समान काम करीत आहेत. मात्र मुंबई महानगरपालिका प्रशासन आपल्या वैद्यकीय महाविद्यालयांतील रुग्णालयांतील डॉक्टरांबाबत दुजाभाव करीत आहे, असा आरोप डॉक्टरांकडून करण्यात आला आहे. दरम्यान, यासंदर्भात प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आम्हाला कठोर पावले उचलावी लागतील. सुरुवातीला काळ्या फिती लावून काम करण्यात येईल. वेळप्रसंगी आंदोलनही करण्यात येईल, असा इशारा आंतरवासिता डॉक्टरांच्या संघटनेकडून देण्यात आला आहे.

# विधानसभेतील सरकारच्या आश्वासनांच्या अंमलबजावणीचे आदेश देऊ शकत नाही, उच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती

■ मुंबई: विशाल कारंडे

विधानसभेत केलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी करण्याचे किंवा त्या अनुषंगाने कारवाई करण्याचे आदेश न्यायालय देऊ शकत नाही, असे उच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट केले. तसेच, माजी प्रशासकीय अधिकारी विश्वास पाटील यांच्यावरील आरोपांची सीआयडी चौकशी करण्यात येईल या २०१८ मध्ये तत्कालीन सरकारने विधानसभेत दिलेल्या आश्वासनाच्या अंमलबजावणीचे आदेश देण्याची मागणी करणारी याचिका ऐकण्यास नकार दिला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह संबंधितांना आदेशाची अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्याची मागणी शेरखान नाझीर यांनी जनहित याचिकेद्वारे केली होती. मात्र, मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने यांच्या या मागणीबाबत प्रश्न उपस्थित केला व उपरोक्त बाब स्पष्ट केली. पाटील यांच्या विरोधात गुन्हे अन्वेषण विभागाची (सीआयडी) चौकशी केली जाईल आणि त्याचा अहवाल विधानसभेत सादर केला जाईल, असे आश्वासन तत्कालिन



मंत्री रवींद्र वायकर यांनी केले होते. या आश्वासनाच्या अंमलबजावणीच्या आदेशाच्या मागणीसाठी खान यांनी याचिका केली होती. तसेच, तपास प्रमुख तपास यंत्रणेकडे सोपवून विधानसभेत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली जाणे आवश्यक असल्याचेही याचिकाकर्त्यांने ही मागणी करताना म्हटले होते. परंतु, अशी मागणी याचिकाकर्ते करूच कसे शकतात, असा प्रश्न करून मुख्य न्यायमूर्तीच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने त्यांना फटकारले.

ही याचिका आहे की राजकीय विधान ? या याचिकेत निबंध लिहिण्यासाठीचे सगळे साहित्य आहे, परंतु, अशा प्रकारच्या याचिका ऐकल्या जाऊ शकत नाहीत, असे न्यायालयाने याचिकाकर्त्यांना सुनावले. तसेच, विधानसभेत दिलेल्या आश्वासनांच्या अंमलबजावणीचे आदेश न्यायालय देऊ शकत नसल्याचा पुनरूच्चार करून याचिकाकर्त्यांची मागणी मान्य करता येणार नसल्याचेही स्पष्ट केले. त्यावर, कायद्याचे राज्य कायम राखणे आवश्यक असल्याचे याचिकाकर्त्यांचे वकील एस. जी. कुदळे यांनी न्यायालयाच्या सांगण्याचा प्रयत्न केला. तथापि, ही बाब कायद्याच्या चौकटीत राहून करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने म्हटले.

# तारापूर अणुभट्टीतून वीजनिर्मितीस विलंब; दुरुस्तीनंतर पुढील किमान १० वर्षे वीज मिळण्याची अपेक्षा

■ **पालघर: सचिन कदम**

तारापूर येथे उभारण्यात आलेल्या देशातील पहिल्या दोन अणुभट्ट्या कार्यान्वित होण्यास आणखी पाच महिने विलंब लागणार आहे. गेल्या चार महिन्यांपासून दुरुस्तीसाठी बंद असलेल्या या अणुभट्ट्या आज, ९ मे २०२४पासून कार्यान्वित होणे अपेक्षित होते. मात्र, दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या विशेष वाहिन्या (पाइप) इटलीतून येण्यास विलंब होत असल्याने या अणुभट्ट्यांतून वीजनिर्मिती सुरू होण्यास आता नोव्हेंबर उजाडण्याची चिन्हे आहेत.

सन १९६९ मध्ये तारापूर येथे सुरू झालेल्या देशातील पहिल्या दोन अणुभट्ट्यांच्या बाह्यभागातील प्राथमिक अभिसरण प्रणाली (प्रायमरी रिसर्क्यूलेशन) पाइपिंगमध्ये अतिसूक्ष्म चिरा गेल्याचे निदर्शनास आल्याने ही प्रणाली बदलण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. नोव्हेंबर २०१९मध्ये इंधन पुनर्भरणीसाठी घेतलेल्या 'शटडाऊन'दरम्यान या अतिसूक्ष्म चिरा निदर्शनास आल्या होत्या. १०० वेल्डिंग जोडण्यापैकी १७ जोडण्यांची यादृच्छिक पद्धतीने तपासणी केल्यानंतर या भागांची दुरुस्ती करण्याऐवजी संपूर्ण प्रणालीमधील पाइपलाइन बदलण्याचा निर्णय घेण्यात आला. प्राथमिक प्रतिबंधित क्षेत्रात असणारा किरणोत्सर्ग, जागेची मर्यादा तसेच या प्रणालीमधील इतर उपकरणांची उपयुक्तता कायम ठेवून पाइपलाइन बदलण्याचे काम आव्हानात्मक होते. या कामासाठी देशपातळीवर निविदा काढून ३५१ कोटी रुपयांचे कार्यादेश जारी करण्यात आले.

हे काम ९ मे २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र विशिष्ट रसायन मिश्रित धातूच्या पाइपचे उत्पादन व उपलब्धता इटली येथून होण्यास विलंब झाला.



त्यामुळे आता हे पाइप आल्यानंतर बसवण्यास १५ सप्टेंबर उजाडणार आहे. तसेच त्यानंतर दीड महिना या यंत्रणेची चाचणी करून प्रकल्प कार्यान्वित करण्यात येईल. त्यामुळे या दोन्ही अणुभट्ट्यांमधून नोव्हेंबरपासून वीजनिर्मिती सुरू होईल, अशी शक्यता आहे.

या प्रणाली बदलासोबत सुरक्षिततेची व वीजनिर्मितीची संबंधित इतर अनेक महत्त्वपूर्ण प्रणालींची सुरक्षा संदर्भातील तपासणी व देखभाल दुरुस्ती करण्यात आल्याने या दोन अणुभट्ट्यांमधून वीजनिर्मिती किमान पुढील १० वर्षे सुरू राहतील असे तारापूर अणुऊर्जा केंद्राचे प्रकल्प संचालक संजय मुलकलवार यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले. त्याचबरोबर प्रकल्पाच्या विविध बांधकामांची अद्यायावत पद्धतीने तपासणी करण्यात आली असून अनेक सुरक्षा संदर्भातील प्रणालींचे नूतनीकरण करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

२१० मेगावॅट क्षमतेने १९६९ पासून वीज निर्मिती करणारा प्रकल्प काही तांत्रिक कारणांमुळे १९८४ पासून १६० मेगावॅट क्षमतेने ऊर्जा निर्मिती करत आहेत. सन २०२० पर्यंत तारापूरच्या अणुभट्टी एक व दोनमधून निर्मित होणारी वीज दोन रुपये ४१ पैसे प्रति युनिट इतक्या माफक दराने महाराष्ट्र व गुजरात राज्याला देण्यात येत होती. प्रणाली सुधारण्यासाठी मोठा भांडवली खर्च झाल्याने या वीज दरामध्ये किंचित वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# 'आदित्य ठाकरेंच्या कपाळावर 'मेरा बाप नपुंसक है'चा शिक्का', नितेश राणे यांचे वादग्रस्त वक्तव्य

■ **वसई: सतिश सोनावणे**

आदित्य ठाकरे यांच्या कपाळावर 'मेरा बाप नपुसंक है' असा शिक्का असून तो आधी त्यांनी पुसावा मग इतरांवर टिका करावी, असे वादग्रस्त वक्तव्य भाजपाचे आमदार नितेश राणे यांनी शनिवारी वसईत केले. यावेळी आदित्य यांचा उल्लेख 'पेंग्विन ठाकरे' असा केला. हिंदूंचे सण साजरे करायचे असतील, हिंदू मुली सुरक्षित ठेवायच्या असतील तर भाजपाला मते द्या, असेही त्यांनी सांगितले. भाजप आमदार नितेश राणे यांची पालघर लोकसभा मतदारसंघासाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शनिवारी त्यांनी वसई आयोजित पत्रकार परिषदेत पक्षाची भूमिका मांडली यावेळी त्यांनी शिवसेना



ठाकरे गटावर जहरी टिका केली. आदित्य ठाकरे यांच्या कपाळावर 'मेरा बाप नपुंसक आहे' असा शिक्का आहे. तो शिक्का त्यांनी आधी पुसावा मग इतरांच्या कपाळावर गद्दार वगैरे म्हणावे अशी टिका केली. यावेळी त्यांनी आदित्य ठाकरे यांचा उल्लेख पेंग्विन ठाकरे असा केला. श्रध्दा वालकर हत्याकांड, साधूंची हत्या आदींची पुनरावृत्ती नको असेल तर मोदींना सत्तेवर आणा. जर कॉंग्रेसला सत्तेवर आणले तर हिंदूंचे सण देखील साजरे करता येणार नाही, असेही ते म्हणाले. नितेश राणे यांना पालघर लोकसभा मतदारसंघासाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती केल्यानंतर शनिवारी दुपारी त्यांनी पत्रकार परिषद घेतली. मात्र एकाही स्थानिक प्रश्नांवर त्यांना बोलता आले नाही.

# डोंबिवलीतील सुयोग हॉल गल्लीतील बेकायदा बांधकाम निवडणुकीनंतर भुईसपाट, सहा महिन्यांपूर्वीच बांधकाम अनधिकृत घोषित

■ **डोंबिवली: आकाश कांबळे**

डोंबिवली पूर्वेतील टिळक रस्त्यावरील छेद गल्लीतील सुयोग हॉल समोरील गल्लीत आराधना या जुन्या पुनर्निर्माणाच्या बेकायदा इमारतीचे बांधकाम पालिकेच्या फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त चंद्रकांत जगताप यांनी सहा महिन्यापूर्वीच विहित प्रक्रिया पूर्ण करून अनधिकृत घोषित केले आहे. हे बांधकाम निवडणूक संपताच पालिकेकडून जमीनदोस्त केले जाणार आहे. बांधकाम सुरू असलेल्या सुयोग हॉल गल्लीत आराधना नावाची जुनी इमारत होती. ही इमारत गेल्या वर्षी तोडण्यात आली. या इमारती समोर नऊ मीटरचा रस्ता नाही. जगदीश खेडेकर या भूमाफियाने ही इमारत उभारली असल्याचे फ प्रभाग कार्यालयातील अभिलेखावरून स्पष्ट झाले आहे.



या इमारतीला पुरेसे क्षेत्र नसल्याने भूमाफिया जगदीश खेडेकर यांनी कल्याण डोंबिवली पालिका नगररचना विभागाच्या बांधकाम परवानग्या न घेता गेल्या वर्षी या बेकायदा इमारतीची उभारणी सुरू केली. या इमारती विषयी तक्रारी प्राप्त होताच, सहा महिन्यापूर्वी फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त चंद्रकांत जगताप यांनी आराधना या जुन्या इमारतीच्या जागेवर बांधण्यात येत असलेल्या बेकायदा इमारतीचा बांधकामधारक खेडेकर यांना नोटिसा पाठवून इमारत बांधकाम परवानगीची कागदपत्रे सादर करण्यास सांगितले. त्यांनी ती फ प्रभागात दाखल केली नाहीत.

साहाय्यक आयुक्त जगताप यांनी सहा महिन्यापूर्वीच आराधना इमारतीच्या जागी उभी राहत असलेली इमारत अनधिकृत घोषित केली. आता या इमारतीचे सात माळ्याचे बांधकाम पूर्ण होत आले आहे. इमारत अनधिकृत घोषित केल्यानंतर जगताप यांनी या बेकायदा इमारतीवर कारवाई का केली नाही, असे प्रश्न तक्रारदार किशोर सोहोनी यांनी उपस्थित केले आहेत. सोहोनी यांनी या बेकायदा इमारत प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी म्हणून मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली आहे. पालिका हद्दीत एकही नवीन बेकायदा बांधकाम उभे राहणार नाही असे हमीपत्र आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी उच्च न्यायालयात दाखल केले आहे. तरीही पालिका हद्दीत राजरोस बेकायदा बांधकामे सुरू आहेत. या हमीपत्राला आव्हान देत सोहोनी यांनी याचिका दाखल केली आहे.

# डीपीएस तलावप्रकरणी अहवाल द्या; केंद्रीय पर्यावरण, वने, हवामान बदल मंत्रालयाचे राज्य सरकारला निर्देश

■ **नवी मुंबई: धनश्री सट्टा**

मागील काही महिन्यांपासून नेरुळ एनआरआय परिसरातील डीपीएस फ्लेमिंगो सरोवराचा नाश थांबवण्यासाठी नॅटकनेक्ट फाऊंडेशनने केंद्राकडे विचारणा केली होती. त्याला प्रतिसाद देत केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाने शुक्रवारी राज्याला या समस्येची तपासणी करून अहवाल देण्याचे निर्देश दिले आहेत.

सिडकोने नेरुळ येथील प्रवासी जलवाहतूक टर्मिनलच्या पर्यावरणीय मंजुरीमध्ये लादलेल्या अटींचे उल्लंघन केल्यामुळे फ्लेमिंगोंचा अधिवास असलेला तलाव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे आणि तेथील फ्लेमिंगोंचा मृत्यू होत असल्याकडे नॅटकनेक्ट फाऊंडेशनने केंद्राच्या पर्यावरण



व वन विभागाला कळवले होते. सिडको नैसर्गिक आंतरभरतीच्या पाण्याच्या प्रवाहात अडथळा आणणार नाही, अशी एक अट होती. परंतु तलावाकडे जाणाऱ्या जलवाहिन्या गाडल्या गेल्या असून त्यामुळे आंतरभरतीचे पाणी तलावाकडे येण्याचा मार्ग बंद झाल्याने डीपीएस तलाव कोरडा पडला असून त्यामुळे मागील काही दुर्घटनांमध्ये १० फ्लेमिंगोंचा मृत्यू झाला तरी काही फ्लेमिंगो जखमी झाल्याचे पाहायला मिळाले होते. फ्लेमिंगोंच्या मृत्यूला सिडको जबाबदार असून त्यांच्याच दुर्लक्षामुळे तलावात येणाऱ्या भरतीच्या पाण्याचा प्रवाह बंद झाल्यानेच फ्लेमिंगोच्या दुर्घटनांचा घटनाक्रम सुरू झाला होता. केंद्राच्या इम्पॅक्ट असेसमेंट विभागातील ईमेलने महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीला या समस्येचे परीक्षण करण्यास आणि तक्रारकर्त्याला तसेच मंत्रालयाला प्रतिसाद देण्यास सांगितले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा फ्लेमिंगोच्या अधिवासावरुन सिडकोच्या बोटचेप्या भूमिकेमुळे साशंकता व्यक्त करण्यात येत आहे. केंद्राच्या इम्पॅक्ट असेसमेंट विभागातील ईमेलने महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीला या समस्येचे परीक्षण करण्यास आणि तक्रारकर्त्याला तसेच मंत्रालयाला प्रतिसाद देण्यास सांगितले आहे.

# घाऊक बाजारात नवीन ज्वारी दाखल: दर प्रतिकिलो ५० ते ६० रुपयांवर

■ **नवी मुंबई: धनश्री सट्टा**

आजमितीला संतुलित आहारात ज्वारीचा समावेश होत असल्याने ज्वारीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे ज्वारीची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. मध्यंतरी ज्वारीच्या दराने प्रतिकिलो ८०-९० रुपयांपर्यंतचा उच्चांक गाठला होता. परंतु एपीएमसीत आता नवीन ज्वारीचे उत्पादन दाखल होत असल्याने दर आवाक्यात आले आहेत. घाऊक बाजारात ज्वारीची प्रतिकिलो ५०-६० रुपयांनी विक्री होत आहे. बाजारात शुक्रवारी १६४५ क्विंटल दाखल झाली असून चांगल्या प्रतीची ज्वारी ५०-६०



रुपयांवर विक्री होत आहे. ज्वारी आवाक्यात आल्याने ग्राहकांना दिलासा मिळत आहे. मात्र मध्यंतरीच्या पावसाने ज्वारीचे नुकसान झाल्याने ३० ते ४० टक्के उत्पादनाला फटका बसला होता. बाजारात ज्वारीची आवक घटल्याने १३ टक्के दरवाढ झाली होती. ज्वारीचा दर प्रतिकिलोला ८० रुपये झाला होता. सोलापूर, आंध्र प्रदेश, कर्नाटक येथून ज्वारीची आवक होत असते. मात्र सध्या बाजारात सोलापूर येथील आवक होत आहे. फेब्रुवारीमध्ये नवीन ज्वारीचे उत्पादन घेतले जाते. त्यानंतर एपीएमसीत नवीन ज्वारी दाखल होण्यास सुरुवात होते.

# गर्दीच्या वेळेत लोकल प्रवाशांना गर्दुल्ले, मद्यपी आणि गजरे विक्रेत्यांचा उपद्रव

■ **कल्याण: आकाश कांबळे**

सकाळच्या वेळेत प्रवाशांची लोकल पकडण्याची घाई असताना या वेळेतच गर्दुल्ले, मद्यपी आणि मोगऱ्याचे गजरे विक्रेते फलाटावर, लोकलच्या दारात आडवे येतात. अनेक वेळा गर्दुल्ले, मद्यपी लोकलच्या दारात पडलेले असतात. घाईत असलेला प्रवासी वेगाने लोकलमध्ये चढला तर तो लोकल दारातील मद्यपीला ठेचकळत आत जातो. अनेक दिवसांपासून हे प्रकार टिटवाळा, बदलापूर, कर्जत, नवी मुंबईकडे जाणाऱ्या वाशी, पनवेल लोकलमध्ये सुरू आहेत.

रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी या मद्यपी, गर्दुल्ले, गजरे विक्रेत्यांना फलाटाच्या बाहेर अडविणे आवश्यक असते. पण रेल्वे सुरक्षा जवानांची नजर चकून हे फिरस्ते लोकलमध्ये रात्रीच्या वेळेत चढतात. रात्रभर लोकलमध्ये झोपतात. सकाळच्या वेळेत लोकल प्रवासी सेवेत रुजू झाले तरी या फिरस्त्यांना त्याची खंत नसते. लोकलच्या दारात अनेक वेळा हे फिरस्ते आडवे पडलेले असतात. अनेक प्रवासी दररोज या मद्यपींना ठेचकळून पडतात. काही मद्यपी महिला प्रवाशांचा डब्यात पडलेले असतात. त्यामुळे महिलांना डब्यात अशा परिस्थितीत बसायचे कसे असे प्रश्न अनेक वेळा निर्माण होतात.

कामावर वेळेत पोहचतो कधी अशी प्रत्येक प्रवाशांची हुरहुर असते. अशा वेळेत मोगऱ्याची फुले, जाईजुईची फुले यांचे गजरे करून ते विक्रीसाठी घेऊन महिला, मुले नियमित, वातानकूलित लोकल डब्यात सकाळच्या वेळेत गर्दीत घुसतात. या मुला, महिलांच्या हातामधील टोपल्या आणि त्यांच्या फेऱ्यांचा प्रवाशांना नाहक त्रास होतो. बहुतांशी महिला वर्ग कार्यालयीन



वेळ गाठण्याच्या चिंतेत असतो. त्यामुळे विक्रेत्यांच्या गजऱ्यांकडे कोणी ढुंकून पाहत नाही. वातानकूलित डब्यात मात्र या गजरे विक्रेत्यांमुळे मोगरा फुलांचा दरवळ पसरतो, असे प्रवाशांनी सांगितले.

आता शाळांना सुट्ट्या लागल्या आहेत. त्यामुळे घरी बसण्यापेक्षा अनेक शाळकरी मुले गजरा आणि किरकोळ वस्तू विक्रीसाठी लोकलमध्ये शिरतात. फलाटावर येताना ही मुले आपल्या जवळील वस्तू एका पिशवीत भरतात. लोकलच्या डब्यात चढले की पिशवीतील सामान विक्रीसाठी बाहेर काढतात.

# जादूटोण्याच्या नावाखाली महिलेवर बलात्कार, मिरा रोडचा ढोंगी बाबा विनोद पंडितला अटक

■ **वसई: दिगंबर जाधव**

**जादू टोण्याच्या नावाखाली एका महिलेवर बलात्कार करून तिची अश्लील छायाचित्रे काढणाऱ्या विनोद पंडित नावाच्या ढोंगी बाबाला नया नगर पोलिसांनी अटक केली आहे. हस्तरेखातज्ञ असल्याचा दावा करणाऱ्या या ढोंगी बाबा पंडितने अनेक महिलांना आपले शिकार बनवले असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. फेसबुकवर जाहिरात करून तो महिलांना आपल्या जाळ्यामध्ये ओढत असे.**

संतोष पोतदार उर्फ विनोद पंडित (५५) नावाच्या या ढोंगी बाबाने फेसबुक वर हस्तरेखा तज्ञ विनोद पंडित या नावाने पेज सुरू केले होते. मीरा रोडच्या शांती नगर येथील मोहिनी अपार्टमेंट मध्ये त्याने आपले दुकान थाटले होते. काळी विद्या, जादूटोणा अवगत असल्याचा दावा त्याने केला होता. वैवाहिक अडचणी आणि विविध समस्या असल्यास पत्रिकेतील दोष दूर करून दिला जाईल असे या फेसबुक पेजवर त्याने म्हटले होते. जोगेश्वरीत राहणाऱ्या एका महिलेला नोकरी लागत नव्हती. ती या बाबाची फेसबुक जाहिरात वाचून त्याच्याकडे गेली होती. बाबाने तिचा विश्वास संपादन केला आणि



जादूटोणा तंत्र विधीच्या नावाखाली तिच्याशी बळजबरीने शरीरसंबंध बनवू लागला. नंतर या महिलेचे लग्न झाले. परंतु एका वर्षातच तिच्या लग्नातील वैवाहिक अडचणी आल्याने पुन्हा या बाबाची भेट घेतली. मात्र या बाबाने जादूटोणाच्या नावाखाली तिच्यावर नैसर्गिक तसेच अनैसर्गिक बलात्कार केला. या काळात बाबाने तिची अश्लील छायाचित्रे काढली होती. या छायाचित्रांच्या आधारे तिला ब्लॅकमेल करून तो तिच्यावर बलात्कार करत होता. तीन वर्ष बाबा तिला धमकावून बलात्कार करत होता. अखेर कंटाळून महिलेने नया नगर पोलीस ठाणे गाठले पोलिसांनी त्याच्यावर भारतीय दंड विधान संहितेच्या कलम ३७६ (२) (एन), ३७७, ५०६ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियमच्या कलम ६७ (बी) तसेच महाराष्ट्र नरबळी आणी इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा उच्चाटन अधिनियम २०१३ अन्वये गुन्हा दाखल करून अटक केली आहे. या ढोंगी बाबाला गुरुवार दुपारी न्यायालयात हजर केले जाणार आहे. आरोपी पंडितच्या मोबाईल मध्ये आम्हाला तीन महिलांची अश्लील छायाचित्रे आढळली आहेत. त्याने अनेक महिलांना आपले शिकार बनवण्याची शक्यता नया नगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अब्दुल हक देसाई यांनी व्यक्त केली आहे. ज्या महिलांची ढोंगी बाबा पंडित याने फसवणूक केली असेल त्याने नया नगर पोलीस ठाण्यात संपर्क साधावा असे आवाहन नया नगर पोलिसांनी केले आहे.

# मोदींच्या नेतृत्वाखाली देश हकूमशाहीकडे! कल्याणच्या सभेत शरद पवारांची टीका

■ **ठाणे: तृप्ती गोरे**

देशाच्या मुख्य नागरी समस्यांकडे राज्यकर्त्यांचे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. महागाई, बेरोजगारी असे अनेक प्रश्न निर्माण झाले असून शेतकऱ्यांच्या कष्ट, मेहनतीकडे दुर्लक्ष झाले



आहे. संसदीय लोकशाहीला प्राधान्य न देता नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली देश हकूमशाहीकडे वाटचाल करत आहे, अशी टीका राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी रविवारी कल्याण येथील प्रचार सभेत केली. भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेश म्हात्रे यांच्या प्रचारासाठी पवार यांच्या कल्याण आणि शहापुरात सभा झाल्या. ऐतिहासिक घटनांचे दाखले देत त्यांनी कल्याणचे महत्व अधोरेखित केले. 'चीनने देशाच्या सीमेवरील महत्वाचा भाग गिळंकृत केला आहे. त्याकडे मोदींचे दुर्लक्ष आहे. त्यांचे लक्ष फक्त निवडणुकीकडे आहे. यापूर्वीच्या निवडणुका लोकांच्या समस्या, त्या मार्गी लावणे या विषयावर घेतल्या जात होत्या. पण आता व्यक्तिगत टीका, टिंगल टवाळी यापलिकडे काहीही केले जात नाही,' असा आरोप पवार यांनी यावेळी केला. संसदीय लोकशाही टिकवण्याचे महत्वाचे काम आता लोकांना करावे लागणार असल्याचे ते म्हणाले. तत्पूर्वी, शहापूर येथील वाशिंदमध्ये झालेल्या सभेत पवार यांनी पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या विचारांच्या घटकांचा १०० टक्के पराभव करणे आवश्यक आहे.

# पापडी तलावात पूल, पर्यावरणवाद्यांचा विरोध; पुलाचे सौंदर्य आणि क्षेत्रफळावर परिणाम होण्याची शक्यता

■ **वसई: सचिन कदम**

वसईच्या पापडी येथील पुरातन तलावात भराव टाकून पुल तयार केला जात असल्याने स्थानिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. यामुळे पुलाच्या सौंदर्याला बाधा येऊन पुलाचे क्षेत्रफळ कमी होण्याची शक्यता आहे. एकीकडे तलावाचे संवर्धन करणे गरजेचे असताना दुसरीकडे तलावात पूल कशासाठी असा सवाल पर्यावरणवाद्यांनी केला आहे.

वसई पश्चिमेला पापडी येथे पुरातन तलाव आहे. हा तलाव सुमारे दिडशे वर्ष जुना आहे. मुख्य रस्त्याला लागून असलेला हा प्रशस्त तलाव पापडीची ओळख बनला आहे. काही वर्षांपूर्वी पालिकेने या



तलावाच्या सुशोभीकरणाचे काम हाती घेतल्यानंतर तलावाचे क्षेत्रफळ कमी झाले होते. आता पालिकेने तलावाच्या मध्यभागी भराव टाकून पूल तयार करण्याचे काम हाती घेतले आहे.या तलावाजवळ जुने हनुमान मंदिर आहे. रुस्ता रुंदीकरणात हे मंदिर तलावात स्थलांतरीत केले जाणार असल्याने पूल तयार केला जात आहे. यामुळे स्थानिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. तलावातून ये-जा करण्यासाठी आम्ही हा पूल बांधत आहोत. त्यासाठी सध्या माती भराव केला जात आहे. पूलाच्या कामाचे खोदकाम करण्यासाठी हा भराव करण्यात आला आहे. नंतर भराव काढला जाईल, असे पालिकेचे कार्यकारी अभियंता प्रकाश साटम यांनी सांगितले.

पाणथळ स्थळे (संवर्धन वव्यवस्थापन) नियम-२०१७ नुसार पाणथळ स्थळांच्या यादीमधील जलाशये व जलाशयांच्या परिसरात कायमस्वरूपी बांधकाम करता येत नाही. नागपूर येथील फुटाळा तलावाला पाणथळ स्थळाचा दर्जा दिला गेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने नागपूर फुटाळा येथील तलावात बांधकाम करण्यावर बंदी घातली होती. पापडी तलाव पाणथळाचा दर्जा नसला तरी तो पुरातन तलाव आहे. त्यामुळे या निर्देशाच्या अनुषंगाने या तलावातही बांधकाम करू नये, अशी मागणी राऊत यांनी केली आहे. तलावाच्या पलिकेड तयार होणाऱ्या गगनचुंबी इमारतीसाठी तर या पूलाचा घाट घातला जात नाही ना अशी शक्यताही त्यांनी वर्तवली आहे.

# समृध्दी महामार्ग विस्तारीकरण: नागपूर-चंद्रपूरसाठी २२, भंडारा-गडचिरोलीसाठी चार, तर नागपूर-गोंदियासाठी २० निविदा



■ मुंबई: माधव अलवा

मुंबई – नागपूर समृध्दी महामार्ग विस्तारीकरण प्रकल्पातील तीन महामार्गांच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) मागविलेल्या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. तीन प्रकल्पांसाठी एकूण ४६ तांत्रिक निविदा सादर झाल्या आहेत. नागपूर-चंद्रपूरसाठी २२, भंडारा – गडचिरोलीसाठी चार, तर नागपूर – गोंदियासाठी २० अशा एकूण ४६ निविदा सादर झाल्या आहेत. येत्या दहा-बारा दिवसांत आर्थिक निविदा खुल्या करण्यात येणार असून त्यानंतर निविदा अंतिम करून चालू वर्षातच तिन्ही महामार्गांच्या कामाला सुरुवात करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन आहे. समृध्दी महामार्गाचा नागपूर – चंद्रपूर, भंडारा – गडचिरोली आणि नागपूर – गोंदिया असा विस्तार करण्यात येणार आहे. या तिन्ही महामार्गांच्या कामासाठी एमएसआरडीसीने ११ टप्प्यांत निविदा मागविल्या होत्या. शुक्रवारी तांत्रिक निविदा खुल्या करण्यात आल्या असून या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. तीन महामार्गांच्या कामासाठी ११ टप्प्यात ४६ निविदा सादर झाल्या आहेत. १९४ किमीच्या नागपूर – चंद्रपूर महामार्गासाठी सहा टप्प्यात २२ निविदा सादर झाल्या आहेत. तर १४२ किमीच्या भंडारा – गडचिरोली महामार्गासाठी एका टप्प्यात चार, तर १६२ किमीच्या नागपूर – गोंदिया महामार्गासाठी चार टप्प्यात २० निविदा सादर झाल्याची माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. तर आता दहा – बारा दिवसांत आर्थिक निविदा खुल्या करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. ही निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यादेश जारी करण्यात येणार आहे. या कामास २०२४ मध्ये सुरुवात करण्याचा एमएसआरडीसीचा प्रयत्न आहे.

# बाओबाब झाडांच्या संरक्षणासाठी पालिकेला आली जाग

■ मुंबई: सचिन कदम

दुर्मीळ अशा बाओबाब (गोरखचिंच) जातीची दोन झाडे विकासकामासाठी कापण्यास परवानगी दिल्यामुळे पर्यावरण प्रेमींनी आंदोलन केल्यानंतर अखेर आता मुंबई महानगरपालिका प्रशासनाला जाग आली आहे. गोरखचिंच झाडांच्या संवर्धनासाठी पालिकेच्या उद्यान विभागाने आता पुढाकार घेतला आहे. पालिकेच्या विविध उद्यानांमध्ये गोरखचिंचेच्या झाडांची लागवड करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. बाओबाब अर्थात गोरखचिंच या अत्यंत दुर्मीळ जातीची दोन झाडे मुंबईत दोन विविध ठिकाणी तोडल्यामुळे पर्यावरणप्रेमींनी काही दिवसांपूर्वी आंदोलन केले होते. सांताक्रूझ येथील एस व्ही रोडवर आणि नंतर मार्वे येथे झाडे तोडण्यात आली. मुंबई मेट्रोच्या कामासाठी सांताक्रूझ येथील झाड तोडण्यात आले, तर मार्वे येथील झाड रस्त्याच्या कामासाठी तोडण्यात आले होते. यामुळे पालिकेच्या



वृक्ष प्राधिकरण समितीने ही झाडे तोडण्यास परवानगी कशी दिली अशी टीका होऊ लागली होती. या प्रकरणी पर्यावरणप्रेमींनी पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल करण्याचा प्रयत्न केला. तसेच पालिका प्रशासनाकडेही दाद मागितली. त्यातच गेल्या आठवड्यात आरे वसाहतीतील आणखी एका बाओबाब वृक्षाची कशी दुर्दशा झाली आहे त्याबाबतचा मजकूर समाज माध्यमांवर टाकण्यात आला होता. त्यानंतर पालिका प्रशासनाने आता या वृक्षाच्या जतनासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. आरे कॉलनीतील मरोळ मरोशी रोडवरील गोरख चिंचेच्या झाडाच्या बुंध्याभोवती असलेले विटांचे बांधकाम मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने रविवारी काढून टाकले. तसेच पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने या झाडाच्या बुंध्याशी नैसर्गिक आळे करून त्यात माती टाकली. तसेच सांताक्रूझमध्ये हटविण्यात आलेल्या पुरातन गोरख चिंचेच्या झाडाच्या बदल्यात महानगरपालिकेच्या विविध उद्यानांमध्ये नव्याने गोरखचिंचेच्या झाडांचे संवर्धन महापालिकेतर्फे करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. गोरखचिंचेची लागवड करण्यासाठी उद्यान विभागाने विविध उद्यानांची निवड केली आहे. या उद्यानांमध्ये गोरख चिंचेच्या झाडांची लागवड करण्यात येणार आहे. त्याकरिता १० ते १५ वर्षांची मोठी रोप मागविण्यात आली आहेत.

# अल्पसंख्यांक याच मातीतील जीडीपीमध्ये त्यांचा वाटा मोलाचा, अनिल देसाई यांचे मत

■ मुंबई: नितीन देवळेकर

अल्पसंख्यांक याच मातीतील असून जीडीपीमध्ये त्यांचा वाटा मोलाचा आहे. मात्र अल्पसंख्यांकांना गेली दहा वर्षे सर्व क्षेत्रात डावलले जात असून त्यांचा आहार, पोषाख, चालीरीती यांबाबतही प्रश्न उभे केले जात आहेत, असे मत शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे मुंबई दक्षिण -मध्य लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार अनिल देसाई यांनी व्यक्त केले आहे. समाजवादी पक्षाचे आमदार



रईस शेख यांनी शनिवारी वांद्रे येथील सायसा क्लब येथे'अल्पसंख्यांक युवक परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेत मुंबई उत्तर -मध्यच्या कॉंग्रेस उमेदवार वर्षा गायकवाड आणि अनिल देसाई सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ते बोलत होते. लोकसभेच्या निवडणूकीसाठी महाविकास आघाडीतर्फे अनिल देसाई आणि वर्षा गायकवाड उभे आहेत. समाजवादी पक्षाने आघाडीला पाठिंबा दिल्यामुळे प्रथमच समाजवादी पक्ष आणि शिवसेना हे एकत्र आल्याचे चित्र दिसत आहे. यावेळी देसाई पुढे म्हणाले, आरटीई कायद्यात महायुती सरकारने केलेले बदल दुर्बल घटकासाठी मारक असून या कायद्यात ॲडव्हान्स कुपन पद्धत आणण्यासाठी तसेच असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षिततेसाठी संसदेत नवा कायदा आणण्याबाबत प्रयत्न केले जातील. वर्षा गायकवाड म्हणाल्या, देशात निर्माण केलेले भीतीचे वातावरण दूर करण्यासाठी आणि लोकशाही मजबुत करण्यासाठी महाविकास आघाडी स्थापन झाली आहे. अल्पसंख्यांकांना डावलून देश पुढे जावू शकत नाही. राज्यघटना देशाचा आत्मा तर लोकशाही श्वास आहे. या दोन्ही गोष्टी असेपर्यत अल्पसंख्यांकाच्या हक्कांना कोणी हात लावू शकणार नाही. इंडिया आघाडी हा सर्वसमावेशक भारत असून लोकसभा निवडणूक आपले हक्क वाचवण्यासाठीची लढाई आहे. त्यामुळे मी समाजवादी पक्षाचा आमदार असूनही ठाकरे गट शिवसेना, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटासाठी मते मागतो आहे. आपले भविष्य बदलण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतदान करा, असे आवाहन समाजवादीचे आमदार रईस शेख यांनी केले. मुस्लिम मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढले असून त्यांच्या गळतीचे प्रमाण घटल्याचे आमदार अस्लम शेख यांनी सांगितले. मुस्लिम ओबीसी विद्यार्थ्यांना आरक्षणाचे लाभ मिळत नाहीत, अल्पसंख्यांक शाळांना मान्यता मिळण्यात अडचणी येतात.

# आता पदवीला ६०-४० गुणविभागणी; मुंबई विद्यापीठाचा निर्णय, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अंमलबजावणी

■ मुंबई: प्रथमेश चव्हाण

मुंबई विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांत यंदापासून पदवी अभ्यासक्रमांसाठी ६०-४० गुणांकन पद्धत लागू होणार आहे. पदवी स्तरावरील बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व इतर



सर्व पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे ६०-४० या पॅटर्नप्रमाणे मूल्यांकन होईल. त्यानुसार प्रत्येक सत्रातील लेखी परीक्षा ६० गुणांची (बाह्य मूल्यांकन) असेल आणि ४० गुण हे सातत्यपूर्ण मूल्यमापनासाठी (अंतर्गत मूल्यांकन) असतील.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या ८९४ महाविद्यालयांत आतापर्यंत काही अभ्यासक्रमांचे १०० गुणांनुसार व काही अभ्यासक्रमांसाठी ७५-२५ अशी गुण विभागणी करून मूल्यांकन होत होते. आता प्रत्येक सत्र परीक्षेसाठी ६० गुण आणि अंतर्गत मूल्यांकनासाठी ४० गुण निश्चित करण्यात आले आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प, गृहपाठ प्रकल्प, विविध औद्योगिक व व्यावसायिक भेटी, ऑन जॉब ट्रेनिंग, व्याख्यानांमध्ये उपस्थिती आदी गोष्टींचा अंतर्गत मूल्यांकनामध्ये समावेश असेल. ६०-४० या गुणविभागणीनुसार विद्यार्थ्यांना बाह्य मूल्यांकन आणि अंतर्गत मूल्यांकन अशा दोन्ही परीक्षांत स्वतंत्रपणे उत्तीर्ण होणे बंधनकारक असेल. या मूल्यमापन पद्धतीची अंमलबजावणी करण्याचे आदेश मुंबई विद्यापीठ प्रशासनाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना दिले आहेत.

# वायव्य मुंबईत महायुतीचे उमेदवार रवींद्र वायकर यांच्या प्रचारासाठी १०० तृतीयपंथीय

■ मुंबई: रघुवीर जाधव

वायव्य मुंबईत तृतीयपंथीही लोकसभेच्या निवडणूकीच्या प्रचारात उतरले आहेत. महायुतीचे उमेदवार शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र वायकर यांच्या प्रचारासाठी १०० हून अधिक तृतीयपंथी उतरले आहेत. रविवारी १२ मे रोजी दिंडोशी विधानसभेत तृतीयपंथीयांनी घरोघरी जाऊन वायकर यांच्या प्रचाराला सुरूवात केली. पश्चिम उपनगरात तृतीयपंथीयांची संख्या मोठी असून या समाजातील लोकांचे प्रश्नही अनेक वर्षापासून सोडवलेले नाहीत. अगदी मूलभूत सुविधांपासून हा वर्ग वंचित आहे. निवडणूकीच्या निमित्ताने या वर्गाने आपल्या समस्या उमेदवारांपर्यंत पोहोचवण्याचे ठरवले आहे. गेल्याच आठवड्यात याच भागातील काही तृतीयपंथी संघटनांनी महाविकास आघाडीचे ठाकरे गटाचे उमेदवार अमोल किर्तीकर यांची भेट घेतली होती व आपल्या समस्या मांडल्या होत्या. तर काही संघटनांनी वायकर यांची भेट घेतली होती. त्यानंतर वायकर यांनी या तृतीयपंथीयांना



आपल्या प्रचारात सामावून घेतले आहे. रविवारी तृतीयपंथीयांनी सायंकाळी ५ ते ७ या वेळात क्रांतीनगर, रामलीला मैदान ते इंदिरानगर या भागात वायकरांचा प्रचार केला. तृतीयपंथीयांसाठी कुठेच शौचालयाची व्यवस्था नसल्याची समस्या काही महिन्यांपूर्वी तृतीयपंथीयांनी वायकर यांच्याकडे मांडली होती. तेव्हा वायकर यांनी तातडीने गोरेगाव (पूर्व) आरे चेक नाका येथे उभारलेल्या उद्यानामध्ये तृतीयपंथीसाठी शौचालय उभारले. त्यामुळे तृतीयपंथीयांनी वायकर यांचा प्रचार करण्याचे ठरवले आहे.

# आशा सेविका चार महिने मानधनापासून वंचित

■ मुंबई: सचिन कदम

राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत ग्रामीण, शहरी आणि आदिवासी भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहचविण्याचे काम ७४ हजार आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक करीत आहेत. मात्र मागील चार महिन्यांपासून राज्य सरकारकडून देण्यात येणारे मानधन या आशा स्वयंसेविकांना मिळालेले नाही. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना आश स्वयंसेविकांना अवघड बनले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत राज्यातील प्रत्येक नागरिकाला आरोग्य सेवा मिळावी यासाठी ७४ हजार आशा स्वयंसेविका कार्यरत आहेत. या आशा स्वयंसेविकांना केंद्र सरकार व राज्य सरकारच्या माध्यमातून



मानधन देण्यात येते. राज्यातील आशा स्वयंसेविकांना महिन्याला १३ हजार रुपये मानधन मिळते. त्यापैकी ८ हजार रुपये राज्य सरकारकडून दिले जातात, तर मानधनाची उर्वरित रक्कम केंद्र सरकारकडून दिली जाते. केंद्र सरकारकडून देण्यात येणारे मानधन आशा स्वयंसेविकांना वेळेवर मिळत आहे. मात्र राज्य सरकारच्या हिश्यातून देण्यात येणारे मानधन जानेवारीपासून मिळालेले नाही. त्यामुळे आरोग्य सेविकांची आर्थिक कोंडी होत आहे.

# विधि पाच वर्षांच्या अभ्यासक्रमाची सीईटी परीक्षा पुन्हा पुढे ढकलली, आता ३० मे रोजी होणार परीक्षा

■ मुंबई: यश सावंत

कायदेविषयक चाचणी परीक्षा असलेली सामाईक विद्यापीठ प्रवेश परीक्षा २०२४ (सीयूईटी) आणि विधि पाच वर्षांच्या अभ्यासक्रमाची राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) एकाच दिवशी येत आहे. त्यामुळे सीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय सीईटी सेलने घेतला आहे. आतापर्यंत विधि पाच वर्षांच्या अभ्यासक्रमाची सीईटी परीक्षा तीन वेळा पुढे ढकलण्यात आली आहे. सध्या सुरू असलेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सीईटी सेलतर्फे घेत येणाऱ्या विविध परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. विधि पाच वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणारी सीईटी परीक्षा दोन वेळा पुढे ढकलण्यात आली



होती. दोन दिवसांपूर्वी जाहीर केलेल्या नव्या वेळापत्रकानुसार ही परीक्षा २२ मे रोजी घेण्याचे जाहीर करण्यात आले होते. मात्र कायदेविषयक चाचणी परीक्षेसाठी घेण्यात येत असलेली सामाईक विद्यापीठ प्रवेश परीक्षा २०२४ (सीयूईटी) २२ मे रोजी होत आहे. या दोन्ही परीक्षा एकाच दिवशी होत आहेत.

त्यामुळे सीईटी सेलने विधि पाच वर्षांच्या अभ्यासक्रमाची सीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या वेळापत्रकानुसार विधि पाच वर्षांच्या अभ्यासक्रमांची परीक्षा ३० मे २०२४ रोजी घेण्यात येणार आहे.

सामाईक प्रवेश परीक्षेचे प्रवेश पत्रक डाऊनलोड करण्यासाठी उमेदवारांना ई-मेल आणि मोबाइलवर संदेशाद्वारे कळविण्यात येईल, असे सीईटी सेलकडून सांगण्यात आले.

# दोन मुले असल्याच्या कारणावरून महिला कर्मचाऱ्याला प्रसूती रजा नाकारणे अनुचित – उच्च न्यायालय

■ मुंबई: विशाल कारंडे

आई होणे ही एक नैसर्गिक घटना आहे आणि कंपनीने महिला कर्मचाऱ्यांबद्दल विचारशील आणि सहानुभूती बाळगणे आवश्यक आहे, असे उच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट केले. तसेच, आधीच दोन मुले असल्याच्या कारणावरून महिला कर्मचाऱ्याला प्रसूती रजा नाकारण्याचा भारतीय विमानतळ प्राधिकरणाचा (एएआय) निर्णय रद्द केला.समाजाचा अर्धा हिस्सा असलेल्या महिलांना कामाच्या ठिकाणी सन्मानाने वागवणे आवश्यक असल्याची टिप्पणीही न्यायमूर्ती ए एस चांदूरकर आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने केली. महिला ज्या सुविधांसाठी पात्र आहे, त्या त्यांना उपलब्ध केल्याच पाहिजे, असेही न्यायालयाने उपरोक्त आदेश देताना स्पष्ट केले. आई होणे ही महत्त्वाची नैसर्गिक घटना आहे. त्यामुळे, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या या स्थितीबाबत कंपनीने विचारशील असण्यासह सहानुभूती बाळगली पाहिजे.



तिची शारीरिक स्थिती लक्षात घेतली पाहिजे. गर्भवती असताना किंवा बाळाच्या जन्मानंतर त्याचे संगोपन करताना कामाच्या ठिकाणी कर्तव्य बजावताना तिला येणाऱ्या अडचणींचा विचार करायला हवा, असेही न्यायालयाने आदेशात म्हटले. एअरपोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया वर्कर्स युनियनने आणि कनकवली श्याम संदल यांनी केलेल्या याचिकेवर निर्णय देताना खंडपीठाने प्राधिकरणाचा २०१४ सालचा संदल यांना प्रसुती रजा नाकारणारा आदेश रद्द केला. संदल यांना आधीच दोन मुले होती आणि त्यांच्या वेळी त्यांना प्रसुती रजेचा लाभ मिळाला होता, असे कारण देत प्राधिकरणाने त्यांचा तिसऱ्या मुलाच्या वेळी प्रसुती रजा नाकारली होती. तर, संदल यांच्या पहिल्या पतीच्या मृत्यूनंतर त्यांना प्राधिकरणाने अनुकंपा तत्त्वावर नोकरी दिली. दरम्यान, संदल यांनी दुसरा विवाह केला. पहिल्या विवाहापासून त्यांना एक मूल असून दुसऱ्या विवाहानंतर त्यांना आणखी दोन मुले झाली. त्यामुळे, पहिल्या लग्नापासून झालेल्या मुलाच्या जन्माच्या वेळी तिने प्रसुती रजेचा लाभ घेतला नव्हता. तसेच, अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळण्याआधी तिच्या दुसऱ्या मुलाचा जन्म झाला. परिणामी, तिसऱ्या मुलाच्या जन्माच्या वेळी पहिल्यांदाच आपण प्रसुती रजा मागितल्याचा दावा संदल यांनी याचिकेत केला होता.

खंडपीठानेही याचिकाकर्त्यांचा दावा योग्य ठरवला. तसेच, सेवा कालावधीत दोन वेळा प्रसूती रजेचा लाभ देण्याचा उद्देश हा लोकसंख्येवर अंकुश ठेवणे नाही, तर प्रसुती रजेचा लाभ देणे असल्याचे न्यायालयाने म्हटले. त्याचप्रमाणे, याचिकाकर्तीने पहिल्या मुलाच्या वेळी प्रसुती रजेचा लाभ घेतलेला नाही. त्यामुळे, ती या लाभासाठी पात्र असल्याचा निर्वाळा देऊन प्राधिकरणाचा आदेश रद्द केला.

# इको पार्कसाठी आरक्षित भूखंडावर ईव्हीएम यंत्रे ठेवण्यासाठी गोदाम; निवडणूक आयोगाच्या कृतीची उच्च न्यायालयाकडून दखल

■ मुंबई: राकेश गायकवाड

**पिंपरी-चिचंवड येथे मेट्रो इको पार्कसाठी आरक्षित असलेला मोकळा भूखंड ताब्यात घेऊन तेथे ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्रे ठेवण्यासाठी गोदाम बांधल्याच्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कृतीची उच्च न्यायालयाने गुरूवारी गंभीर दखल घेतली. तसेच, हा आरक्षित भूखंड ताब्यात घेतालच कसा ?**

अशी विचारणा करून त्याच्या पद्धतीविषयीही न्यायालयाने आक्षेप घेतला. या सगळ्या प्रकाराबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले. लोकशाहीमध्ये निवडणुका घेणे हा एक महत्त्वपूर्ण, सार्वजनिक उपक्रम आहे. परंतु, कायद्याचे पालन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या प्रकरणी भूखंडाचा वापर कशासाठी केला हे आमच्यासाठी चिंतेची बाब नाही, तर भूखंड ताब्यात घेण्याच्या पद्धतीवर आमचा आक्षेप आहे, असे खडेबोल मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने निवडणूक आयोगाला सुनावले, निवडणूक आयोगाच्या या कृतीमुळे सर्वसामान्यांमध्ये चुकीचा संकेत जाईल आणि त्याला परवानगी दिली तर अनागोंदी माजेल, असे ताशेरेही न्यायालयाने ओढले.

पिंपरी – चिंचवड, रावेत येथे पुणे मेट्रो प्रकल्पासाठी तोडण्यात आलेल्या झाडांच्या नुकसानभरपाईचा भाग म्हणून इको पार्कमध्ये सुमारे ६०० झाडे लावण्यात आली आहेत. या उद्देशासाठी हा भूखंड आरक्षित ठेवण्यात आला होता. मात्र, या खुल्या भूखंडावर ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीएस ठेवण्यासाठी गोदाम



बांधण्यात येत आहे. तिथे प्रशिक्षण केंद्राचेही बांधण्यात केले जात आहे, असा दावा करणारी जनहित याचिका पुणेस्थित प्रशांत राऊळ यांनी वकील रोनिता भट्टाचार्य यांच्यामार्फत केली. पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील मोकळी जागा आणि शेजारील भूखंड गोदाम बांधण्यासाठी उपलब्ध करावी, अशी मागणी फेब्रुवारीमध्ये राज्य सरकारने पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. मेट्रो पार्कचा भूखंड सरकारी कामांसाठी आरक्षित असतानाही जिल्हाधिकाऱ्यांनी दोन्ही भूखंड ताब्यात घेऊन तेथे गोदामाचे बांधकाम सुरू केल्याचे याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला सांगितले. त्याची मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाने गंभीर दखल घेतली व कोणत्याही नियमांचे, प्रक्रियेचे पालन न करता भूखंडाचा ताबा कसा घेतला? भरपाईशिवाय अशी परवानगी देणारा कोणता कायदा अस्तित्त्वात आहे ? अशी प्रश्नांची सरबत्ती करून निवडणूक आयोगाच्या कृतीवर ताशेरे ओढले. त्यानंतर, या भूखंडाच्या आरक्षित आणि मोकळ्या जागेवर कोणतेही बांधकाम करणार नाही अथवा तेथील झाडाला हात लावणार नाही, असे आश्वासन निवडणूक आयोग आणि जिल्ह्याधिकाऱ्यांच्या वतीने वरिष्ठ वकील आशुतोष कुंभकोणी आणि वकील अक्षय शिंदे यांनी न्यायालयाला दिले. कॉंक्रिटचे जंगल बांधून नागरिकांचा श्वास कोंडू नका सध्यस्थितीला मोजकेच मोकळया जागा, हरितपट्टे शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे तेही ताब्यात घेऊन तेथे इमारती बांधू नका. कॉंक्रिटचे जंगल बांधून नागरिकांचा श्वास कोंडू नका, त्यांना मोकळा श्वास घेण्यासाठी हे मोकळे भूखंड, बागा राहू द्या, अशी उद्विग्नता मुख्य न्यायमूर्तींनी प्राधिकरणांच्या कृतीवर ताशेरे ओढताना व्यक्त केली.

# परदेशी भारतीय इच्छा असुनही लोकसभेच्या मतदानापासून वंचित, परदेशातून भारतात मतदान करण्याची सुविधा नसल्याने इच्छुकांना फटका

■ **कल्याण: आकाश कांबळे**

परदेशात विविध देशांमध्ये नोकरी, निवृत्तीनंतर आपल्या मुलांकडे परदेशात राहत असलेल्या काही कुटुंबीयांची भारतामधील आपल्या निवास स्थान असलेल्या भागात मतदार यादीत नावे आहेत. अशा परदेशस्थांनी भारतातील लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करण्याची इच्छा निवडणूक अधिकाऱ्यांकडे व्यक्त केली आहे. अशा प्रकारची कोणतीही सुविधा परदेशातील भारतीय नागरिकांसाठी नसल्याचे निवडणूक विभागाकडून परदेशी भारतीय नागरिकांना कळविण्यात आले आहे.

भारताच्या विविध भागातील तरूण नोकरीनिमित्त परदेशात गेले आहेत. काही कुटुंबीय आपल्या मुलाच्या सोबत किंवा काही व्यवसाय, उद्योगानिमित्त विदेशात राहत आहेत. यामधील बहुतांशी मंडळींची नावे भारतामधील मतदार यादीत आहेत. भारतात सध्या लोकसभेच्या निवडणुकांचा महौल आहे. परदेशस्थ नागरिक, भारतीय नागरिकांचे भारतामधील निवडणुकांकडे लक्ष लागले आहे. परदेशात राहत असलेले पण भारतात आपल्या गाव, शहरात राहत असलेल्या मतदार यादीत नाव असल्याने अनेक परदेशी भारतीय नागरिकांनी भारतात सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करण्याची इच्छा तेथून संपर्क करून निवडणूक अधिकाऱ्यांकडे व्यक्त केली आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी



निवडणूक आयोगाकडून माहिती घेऊन परदेशात राहत असलेल्या कोणाही भारतीय नागरिकाला टपाल किंवा अन्य कोणत्याही माध्यमातून मतदान करण्याची सुविधा उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आले आहे.

काही भारतीय विदेशात गेल्यानंतर लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. त्यामुळे त्यांची कोंडी झाली. अगोदर हे माहित असते तर विदेशात आलो नसतो, असे परदेशस्थ भारतीय सांगतात. जगातील सर्वात मोठी लोकशाही आणि त्या देशाचे आपण नागरिक आहोत, या अभिमानाने परदेशात राहत असलेल्या काही भारतीयांना लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करण्याची खूप इच्छा आहे. त्यांनी विविध प्रकारचे प्रयत्न सुरू करून लोकसभेसाठी मतदान करता येईल का याची चाचपणी सुरू केली आहे. अमेरिका, युरोप, अरब देशातील काही भारतीय नागरिकांनी काही राजकीय पक्षांशी संपर्क करून आम्हाला मतदानासाठी भारतात येण्यासाठी काही साहाय्य होऊ शकेल का, अशी विचारणा केली असल्याचे समजते. आता २० मे रोजीच्या मतदानासाठी भारतात यायचे असेल तर विमानाचे परदेशातून तात्काळ तिकीट काढावे लागेल. यासाठीचा तिकीट खर्च खूप मोठा आहे. हा खर्च निवडणूक काळात करण्यात येत असल्याने राजकीय पक्षांना त्याचा हिशेब निवडणूक आयोगाला द्यावा लागेल.

## प्रदूषणकारी ४ आरएमसी प्रकल्पांवर कारवाई, अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी गुन्हे दाखल

■ **वसई: दिगंबर जाधव**

प्रदूषण पसरविणाऱ्या महामार्गावरील सिमेंट कॉक्रीटच्या (आरएमसी) ४ प्रकल्पांवर अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी पालिकेने गुन्हे दाखल केले आहेत. महाराष्ट्र नगररचना अधिनियाच्या विविध कलमाअंतर्गत नायगाव पोलीस ठाण्यात हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पालिकेच्या विशेष नियोजन प्राधिकरणाने ही कारवाई केली आहे. गुन्हे दाखल असलेल्या प्रकल्पांमध्ये आरएमसी इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड, स्कायलॅण्ड आरएमई इन्फ्रा, एमई इन्फ्रा आणि सुपर आरएमसी बुल्डकॉन प्रा. लिमिटेड या ४ कंपन्यांचा समावेश आहे.



मुंबई अहमदाबाद महामार्गावर सुरू असलेल्या सिमेट कॉंक्रीटच्या आरएमसी प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात प्रदूषण निर्माण होत आहे. या कारखान्यातून दररोज अवजड वाहने, मिक्सर तसेच वाळूची वाहने ये-जा करत असतात. प्रकल्पांकडून पर्यावरणाच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणतेच नियम पाळले जात नाहीत. तसेच प्रदूषण रोखण्याची कोणतीच यंत्रणा नसल्याने या कारखान्यातून सतत धुळीचे प्रदूषण होत असते. या वाढत्या धूळ आणि प्रदूषणामुळे हवेची गुणवत्ता ढासळून नागरी आरोग्यावर ही याचा मोठा परिणाम होऊ लागला आहे. या प्रदूषणकारी प्रकल्पांची तपासणी करून त्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत होती. अशा प्रकल्पांच्या विरोधात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोटीसा बजावल्या होत्या. वसई विरार महापालिकेने देखील आता या प्रकल्पांच्या विरोधात कडक कारवाई सुरू केली आहे.

महामार्गावरील मालजीपाडा गावात असेलल्या ९ पैकी ४ प्रकल्पांच्याविरोधात वसई विरार महापालिकेच्या विशेष नियोजन प्राधिकरण विभागाने अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत.महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५२, ५३, ५४ अंतर्गत हे गुन्हे दाखल करणअयात आले आहेत.

## सोलापुरात कांद्याच्या ९३ पिशव्यांना केवळ १० हजार रूपये पट्टी, आवक कमी होऊनही दर घसरण

■ **सोलापूर : माधव अलवा**

लोकसभा निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान होऊन आठवडाही उलटत नाही, तोच सोलापुरात कांदा दराची घसरण सुरू झाली असून त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे. माढा तालुक्यातील एका कांदा उत्पादक शेतकऱ्याना आणलेल्या कांद्याच्या ९३ पिशव्यांना केवळ १० हजार रूपयांचा भाव मिळाला. या शेतकऱ्याने कांद्याच्या लागवडीसाठी केलेला खर्च ६० हजार रूपयांपर्यंत झाला होता. प्रत्यक्षात त्याच्या हातात कांद्याची पट्टी १० हजार रूपये आली. सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये सध्या कांद्याची आवक घटून १६ हजार ७०० क्विंटलपर्यंत होत असूनही कांद्याच्या दरात वाढ होण्याऐवजी घट होत आहे. लोकसभा निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान ७ मे रोजी झाले. त्याअगोदर सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये दररोज २५ हजार क्विंटलपर्यंत कांद्याची आवक होत होती. त्यावर प्रतिक्विंटल दर १४०० रूपये ते २७००



रूपयांपर्यंत मिळत होता. परंतु लोकसभेचे मतदान होऊन आठवडाही होत नाही तोच कांद्याची आवक कमी होऊन सुध्दा कांदा दर वाढण्याऐवजी उलट घटत चालला असल्याचे दिसून येते. दोन दिवसांपूर्वी सुमारे २५ हजार क्विंटल कांदा दाखल झाला असता दर घसरण होऊन कमाल दर २२०० रूपये आणि सरासरी दर ११०० रूपये मिळत होता. त्यानंतर कांदा आवक १६ हजार ७०० क्विंटलपर्यंत खाली आली असता दर मात्र एक हजार ते दोन हजार रूपयांपर्यंत मिळाला आहे. सरासरी दरापेक्षा कमी म्हणजे पाचशे रूपयांपर्यंत दर मिळालेल्या कांद्याचे प्रमाण जास्त आहे. माढा तालुक्यातील दारफळ सीना येथील कांदा उत्पादक शेतकरी पृथ्वीराज चव्हाण यांनी सुमारे ६० हजार रूपये लागवड खर्च करून पिकविलेला ९३ पिशव्या कांदा विक्रीसाठी सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये आणला असता सूर्या लकी ट्रेडर्समध्ये कांद्याला कवडीमोल दर मिळाला. त्याच्या हातात केवळ १० हजार रूपयांची पट्टी आली. लागवड खर्चाच्या २० टक्के खर्च निघाला नाही.

## शिकार, तस्करीला आळा घालण्यासाठी सायबर सेल

■ **सांगली : संजीनी खाडे**

सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्रात शिकार आणि अवैध वन्य प्राण्याच्या अवयवांचा चोरटा व्यापार रोखण्यासाठी कोल्हापूरमध्ये सायबर सेल सुरू करण्यात आला आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाप्रमाणे हा सेल कार्यरत राहणार असल्याचे सांगण्यात आले. या सेलचे उद्घाटन क्षेत्र संचालक आर. एम. रामानुजम यांच्या हस्ते करण्यात आले. याबाबत माहिती देतांना विभागीय वन अधिकारी एस.एस. पवार यांनी सांगितले, वन्यजीव व



वनगुन्हे यांना आळा घालण्यासाठी संशयित आरोपी यांच्यावरील आरोप सिद्द होण्यासाठी आवश्यक तांत्रिक माहिती या सायबर सेलच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. यामुळे अवैध शिकारी व वन्यप्राण्यांच्या अवयवांच्या चोरट्या व्यापारास आळा घालण्यासाठी तसेच तपास करण्यासाठी वन विभागाकडील क्षेत्रिय कर्मचारी, अधिकारी यांना लाभ होणार आहे. वने व वन्यजीव विषयक गुन्हे हाताळणे व आरोपीच्या विरोधात पुरावे गोळा करणे व राज्या बाहेरील आरोपींनाही पकडणे सोईचे होणार आहे.

## पीएसआय शारीरिक चाचणीचे वेळापत्रक जाहीर; कधी, कुठे होणार चाचणी?

■ **पुणे: अभिजीत येरल्लू**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) महाराष्ट्र दुय्यम सेवा




अराजपत्रित गट ब मुख्य परीक्षा २०२२ मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची शारीरिक चाचणी जाहीर करण्यात आली आहे. २४ मे ते ६ जून या कालावधीत नवी मुंबई येथे शारीरिक चाचणी घेतली जाणार आहे. एमपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. एमपीएससीने या पूर्वी शारीरिक चाचणीचे वेळापत्रक जाहीर केले होते. त्यानुसार १५ एप्रिल ते २ मे या कालावधीत शारीरिक चाचणी घेतली जाणार होती. मात्र लोकसभा निवडणुकीमुळे शारीरिक चाचणी पुढे ढकलण्यात आली होती. मात्र शारीरिक चाचणीसाठी मैदान, अधिकारी आणि कर्मचारी उपलब्ध करून देण्यास पोलीस महासंचालक कार्यालयाने सहमती दर्शवली आहे.

त्यामुळे शारीरिक चाचणीचा सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला. शारीरिक चाचणी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित प्रणालीद्वारे घेतली जाणार आहे. त्यामुळे चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी शारीरिक चाचणीच्या सरावाच्या दृष्टीने याची नोंद घेऊन सराव करावा. शारीरिक चाचणीचा सविस्तर सुधारित कार्यक्रम https://mpsc.gov.in/ या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार असल्याचे प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## कळवा, मुंब्रा, दिव्यात पुन्हा बेकायदा बांधकामे, उबाठाने समाजमाध्यमांवर प्रसारित केली बांधकामांची छायाचित्रे

■ **ठाणे: तृप्ती गोरे**

लोकसभा निवडणुकीच्या काळात ठाणे महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या बेकायदा बांधकामांच्या मुद्द्यावरून भाजपचे आमदार संजय केळकर यांनी संताप व्यक्त केला होता. त्यापाठोपाठ आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख संजय घाडीगावकर यांनी कळवा, मुंब्रा आणि दिवा भागात बेकायदा बांधकामे सुरू असल्याचे पुरावे समाज माध्यमांवर सादर केले आहेत. येथील बांधकामांची छायाचित्र प्रसारित करत त्यावर कारवाई करून दाखविण्याचे आव्हान त्यांनी पालिका प्रशासनाला दिले आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील बेकायदा बांधकामांविरोधात तत्कालीन आयुक्त अभिजीत बांगर यांनी विशेष मोहिम हाती घेतली होती. यामध्ये इमारतीचे बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले होते. लोकसभा निवडणुक काळात पालिका यंत्रणा व्यस्त असल्याचा फायदा घेऊन भूमाफिया पुन्हा सक्रीय झाले. यासंबंधीच्या तक्रारी नवे आयुक्त सौरभ राव यांच्याकडे प्राप्त होताच त्यांनी भूमाफियांनी उभारलेली बांधकामे जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानंतर शहरात बेकायदा बांधकामे सुरू असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. काही दिवसांपुर्वी भाजपचे आमदार



संजय केळकर यांनी शहरात बेकायदा बांधकामे सुरु असल्याच्या मुद्द्यावरून संताप व्यक्त करत पालिका प्रशासनावर टिका होती. त्यापाठोपाठ आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख संजय घाडीगावकर यांनी शहरात बेकायदा बांधकामे सुरु असल्याचे पुरावेच समाज माध्यमांवर सादर केल्याने खळबळ उडाली आहे. एकट्या दिवा भागात ८८ बेकायदा बांधकामे सुरू असल्याचा अंदाज घाडीगावकर यांनी वर्तविला. त्याचबरोबर कळवा आणि मुंब्रा भागातही बेकायदा बांधकामे सुरूच असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## उबाठाचे २०१९ मध्ये काँग्रेसीकरण झाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची टीका

■ **ठाणे: तृप्ती गोरे**

उबाठा आधीच लीन होती, आता ती कधीही विलीन होऊ शकते, असे शरद पवार यांचे म्हणणे आहे. परंतु २०१९ मध्येच उबाठाचे कॉंग्रेसीकरण झाले आहे, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केली. प्रादेशिक पक्षाने कॉंग्रेसमध्ये विलीन झाले पाहिजे, असे शरद पवार म्हणतात. म्हणजेच त्यांनी हार मानली आहे का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील २७ गाव संघर्ष समितीचे पदाधिकारी गुलाब वझे, दत्ता वझे आणि कार्यकर्त्यांनी गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. या पक्ष प्रवेशानंतर बोलताना त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टिका केली. २७ गाव संघर्ष समिती ही न्यायहक्कासाठी संघर्ष करणारी ही समिती आहे. या समितीच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत पक्षप्रवेश केला आहे. कल्याण लोकसभा मतदार संघामधील विविध पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते दररोज शिवसेनेत दाखल होत आहेत. खासदार शिंदे यांनी केलेल्या कामावर



विश्वास ठेवून अनेकजण पक्षात येत आहे. ताकदीचे कार्यकर्ते पक्षात येत असल्याने आमचा पक्ष मजबूत होत आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

प्रादेशिक पक्षाने कॉंग्रेसमध्ये विलीन झाले पाहिजे, असे शरद पवार म्हणतात. म्हणजेच त्यांनी हार मानली आहे का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. उबाठा आधीच लीन होती, आता ती कधीही विलीन होऊ शकते, असे शरद पवार यांचे म्हणणे आहे. परंतु २०१९ मध्येच उबाठाचे कॉंग्रेसीकरण झाले आहे, अशी टीका करत त्यांना त्यांचा पराभव दिसू लागल्याचा दावाही त्यांनी केला. घोडा मैदान लांब नाही. चार तारखेला मतमोजणी आहे. आतापर्यंत तीन टप्प्यात मतदान झाले असून त्यात महायुती आघाडीवर आहे, असा दावाही त्यांनी केला. महायुती सरकारने गेल्या दोन वर्षात केलेले काम आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षात केलेले काम याची पोचपावती देशासह राज्यातील जनता देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा महायुतीचा घटक पक्ष आहे. यामुळे महायुतीची सभा शिवाजी पार्कवरच होईल. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा रोड शो होणार आहे. पंतप्रधान मोदी हे जिथे जातात, तिथे माणसांची मोठी गर्दी होते. त्यांच्या स्वागतासाठी मुंबई आणि महायुतीचे सर्व पदाधिकारी तयार आहेत, असेही ते म्हणाले.

## ह्या उपायाने चरबीच्या गाठी विरघळून जातील!

मित्रांनो अगदी सहजरीत्या उपलब्ध होणाऱ्या कमालीच्या वनस्पतीचा एक चमचा चूर्ण फक्त ७ दिवस आंघोळीच्या पाण्यामध्ये टाकून आंघोळ करा. तुमच्या शरीरावर कुठल्याही प्रकारच्या चरबीच्या गाठी असतील तर त्या पूर्णपणे विरघळून जाते. मित्रांनो कुठल्याही प्रकारचा त्वचारोग, तुम्हाला उष्णतेचा त्रास असेल, अंगावर पुरळ येणे, तसे अंगावर पित्त उठत असेल त्याच बरोबर तुम्हाला सांधेदुखी होत असेल, आर्थरायटिस त्रास असेल, अर्ध डोकं दुखत असेल किंवा डोकेदुखीचा त्रास तुम्हाला होत असेल, वारंवार चक्कर येत असेल अशा अनेक प्रकारच्या समस्या या चमत्कारिक वनस्पतीने पूर्णपणे मुळासकट निघून जातात. मित्रांनो तर ही वनस्पती वनस्पती कोणती आहे? याचा वापर कसा करायचा आहे? या सर्व गोष्टी आपण पाहणार आहोत. ही वनस्पती तुम्हाला कुठल्याही मेडिकल स्टोअरमध्ये सहजरीत्या मिळते. त्या शिवाय तुमच्या घराच्या आजूबाजूला सर्वत्र उपलब्ध असणारी वनस्पती आहे. असे एकही गाव किंवा असे एकही घर नसेल किंवा अस एकही शहर नसेल जिथे तुम्हाला ही वनस्पती उपलब्ध होणार नाही.

मित्रांनो सर्वांच्या परिचयाची ही वनस्पती आहे. याचा वापर कसा करायचा ते सुद्धा मी तुम्हाला सांगणार आहे. तुम्हाला त्वचारोगाचे अगदी कुष्ठ रोगापासून ते सोरायसिस पर्यत त्वचारोग त्रासाचे, कुठल्या प्रकारचा त्वचारोगाचे अंगावर फंगल इन्फेक्शन मुळे पुरळ येत असतील, खाज येत असेल अशा प्रकारचा कुठलाही त्वचारोग तुमच्या अंगावर जर असेल किंवा तुमच्या अंगावर पित्तामुळे पुरळ येत असेल, फोड येत असतील घामोळ्या तसेच उष्णतेचा त्रास होत असेल अशा प्रकारचा कुठलाही त्रास असेल तर त्यासाठी सुद्धा ही वनस्पती अत्यंत महत्त्वाची आहे.

मित्रांनो ही वनस्पती म्हणजे नागरमोथा. नागरमोथा चूर्ण आपल्याला कुठल्याही मेडिकल स्टोअरमध्ये सहजरीत्या मिळते.



नागरमोथा ज्याला आपण मराठी मध्ये लव्हाळा म्हणतो लव्हाळा हे सर्वत्र उपलब्ध असणारी वनस्पती आहे. याला हिंदीमध्ये नागरमोथा संस्कृत मध्ये नागर मुस्ताक असं म्हटलं जातं. मित्रांनो सर्वत्र उपलब्ध असणारी ही वनस्पती आहे. आजही ग्रामीण भागामध्ये तुम्ही जर गेला जर तुम्हाला माहिती असेल तर ज्या व्यक्तींना अंगावर पित्त अंगावर चरबीच्या गाठी आहेत किंवा कुठल्याही प्रकारचा त्वचारोग आहेत तर अशा व्यक्तीला त्याच्या लव्हाळयाच्या किंवा नागरमोत्याच्या बुडाची माती अंगाला लावून आंघोळ घातली जाते. त्यामुळे त्यांच्या अंगावर चरबीच्या गाठी विरघळून जातात. फार पूर्वीपासून हा उपाय आयुर्वेदामध्ये आहे. अत्यंत उपयुक्त वनस्पती आहे. तुम्हाला अंगात वाताचा त्रास असेल. थंडीमध्ये वात जाणवतो. बऱ्याच जणांना सांधेदुखीचा त्रास होतो. अर्थराइटिस त्रास होतो. तर अशा व्यक्तींना सुद्धा या वनस्पतीचा खूप फायदा होतो. मित्रांनो नागरमोथ्याचे चूर्ण आपल्याला आणायचा आहे किंवा जर तुम्ही खेडेगावांमध्ये राहत असेल तर नागरमोथा म्हणजेच लव्हाळा उपटल्यानंतर त्याच्या मुळाशी किंवा बुडामध्ये जी गाठ किंवा कंद निघते असे दोन कंद आणायचा आहेत आणि ते कुटून घ्यायचे आहे. ओले वापरले तरी चालतील वाळवून त्याचा वापर केला तरी चालेल. जर पावडर असेल तर एक चमचा पावडर आपल्या आंघोळीच्या पाण्यामध्ये टाकायची आहे. आंघोळीचे पाणी गरम करत असताना त्याच्या मध्ये टाकायचे आहे. तुम्ही जेवढे प्रमाणामध्ये आंघोळीला पाणी गरम करतात तेवढेच गरम करायचे. पाणी उकळून घ्यायची गरज नाही आणि हे पाणी अगदी तोंडामध्ये जरी गेले तरी त्याचा कुठलाही साईड इफेक्ट होत नाही. पोटामध्ये जर गेलं तर त्याचा कुठला साईड इफेक्ट नाही कारण नागरमोथा चूर्णाचा वापर हा खाण्यासाठी सुद्धा केला जातो. नागरमोथा चूर्ण पोटामध्ये गेल तोंडामध्ये गेलं तरी त्याचा साईड इफेक्ट नाही लहान असो मोठ असो सगळ्यांना वापरता येतं. आंघोळीच्या पाण्यात टाकायचे. अशी सलग सात सहा ते सात दिवस या पाण्याने आंघोळ करा. यामुळे तुमच्या अंगावर चरबीच्या गाठी असतील किंवा अंगावर तुमच्या पुरळ असेल तसेच पित्ताचा त्रास होत असेल पित्तामुळे सुद्धा अंगावर लाल गांधी येण, पुरळ येणे असा कुठलाही त्रास तुम्हाला असेल तर ते या उपायांमुळे पूर्णपणे निघून जातात.

मित्रांनो त्याचबरोबर बऱ्याच व्यक्तींना डोकेदुखीचा त्रास असतो तर अशा व्यक्तींचा डोकेदुखीचा त्रास या सहा सात दिवसाच्या वापराने पूर्णपणे निघून जातो. त्याचबरोबर बऱ्याच जणांना मिर्गी किंवा चक्कर येण्याची समस्या असते ती सुद्धा या उपायाने पूर्णपणे निघून जाते. शरीर पूर्णपणे तुमच्या शुद्ध होतं. या नागरमोथा चूर्णामुळे तुमचा ब्लड सर्क्युलेशन चांगलं होतं आणि त्यामुळे विविध प्रकारचे आजार आहेत ते तुमचे निघून जातात. या वनस्पतीचा वापर तुम्ही ताजी आणून करा किंवा वनस्पतीचे चूर्ण तुम्हाला मिळत असेल तर तुम्हीच चूर्णाचा वापर करा. या वनस्पतीचा केसांना सुद्धा चांगला फायदा होतो. आंघोळीच्या पाण्यात मध्ये टाकलेला असल्यामुळे. मित्रांनो या वनस्पतीचा वापर तुम्ही करा किंवा आयुर्वेदिक दुकानांमधून चूर्ण वापर करा अत्यंत उपयुक्त वनस्पती आहे या वनस्पतीचा वापर तुम्ही आवश्यक करून बघा. याचा नक्कीच फायदा तुम्हाला होईल.

# धर्मावरून पाकिस्तानला इस्लामिक राष्ट्र बनवलं तर भारताला..; कंगनाचं वक्तव्य चर्चेत

■ हिमाचल प्र.: वृत्तसंस्था

हिमाचल प्रदेशमधील मंडी या मतदारसंघातून भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवणार असल्याचं घोषित झाल्यापासून अभिनेत्री कंगना राणौत सतत चर्चेत आहे. लोकसभा निवडणुकीत जिंकून येण्यासाठी कंगना जोरदार प्रचार करत आहे. नुकतंच तिने हिंदू राष्ट्रासंदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे. कुल्लूमध्ये निवडणूक प्रचारादरम्यान कंगना म्हणाली, '१९४७ मध्ये जेव्हा धर्माच्या आधारावर पाकिस्तान बनवलं गेलं होतं. तर त्यावेळी भारताला हिंदू राष्ट्र घोषित का केलं नाही?'

कंगना पुढे म्हणाली, 'आपले पंतप्रधान हे युगपुरुष आहेत. आपल्या पूर्वजांनी मुघलांची गुलामी पाहिली, त्यानंतर इंग्रजांची गुलामी पाहिला आणि त्यानंतर काँग्रेसचं कुशासन पहायला मिळालं. पण आपल्याला खऱ्या अर्थाने २०१४ मध्ये स्वातंत्र्य मिळालं. विचार करण्याचं स्वातंत्र्य, सनातनचं स्वातंत्र्य, आपला धर्म स्वीकारण्याचं स्वातंत्र्य, या देशाला हिंदू राष्ट्र बनवण्याचं स्वातंत्र्य. जेव्हा १९४७ मध्ये आपल्या धर्माच्या आधारवर पाकिस्तानला इस्लामिक राष्ट्र बनवलं गेलं, तेव्हा भारताला हिंदू राष्ट्र का घोषित केलं नाही? याला आम्ही हिंदू राष्ट्र बनवू.' कंगनाने याआधीही अशाच पद्धतीचं वक्तव्य केलं होतं. नोव्हेंबर २०२१ मध्ये ती म्हणाली होती, 'या देशाला खरं स्वातंत्र्य १९४७ मध्ये नाही तर २०१४ मध्ये मिळालं.' तिच्या या वक्तव्यावरून तेव्हा बराच वाद निर्माण झाला होता.



हिमाचल प्रदेशमधील मंडी या लोकसभा मतदारसंघात कंगनाची टक्कर काँग्रेसच्या विक्रमादित्य सिंह यांच्याशी होणार आहे. या मतदारसंघासाठी येत्या १ जून रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान या दोघांनी एकमेकांवर बरीच टिकाटिप्पणी केली. भाजपने हिमाचल प्रदेशमधील मंडी लोकसभा मतदारसंघातून कंगनाला उमेदवारी दिल्यानंतर राज्यातील एकमेकांशी भांडणारे काँग्रेसचे नेते एकत्र आले आहेत. इतकंच नव्हे तर हिमाचल प्रदेशातील दोन मोठ्या राजघराण्यांचीही कंगनाविरोधात छुपी एकजूट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. लोकसभा निवडणुकीत जिंकून येण्यासाठी कंगना जोरदार प्रचार करत आहे. एका रॅलीदरम्यान कंगनाकडून मोठी चूक झाली होती. राष्ट्रीय जनता दलचे नेते तेजस्वी यादव यांचं नाव घेण्याऐवजी तिने चकून तिच्याच पक्षातील म्हणजेच भाजप खासदार तेजस्वी सूर्या यांचं नाव घेतलं होतं. मासे खाण्यावरून कंगनाला तेजस्वी यादव यांच्यावर निशाणा साधायचा होता.

# दोन तासांच्या दौऱ्याला इतक्या जड बॅगा? शिंदेंकडून नाशकात १२ कोटींचं वाटप, संजय राऊतांचा आरोप

■ नाशिक: रघुवीर जाधव

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी नाशिकमध्ये महायुतीकडून पैसेवाटप होत असल्याचा आरोप केला आहे. 'मुख्यमंत्री खाऊ घेऊन आले तो क्षण!' असं कॅप्शन देत संजय राऊत यांनी एक्स सोशल मीडिया अकाऊण्टवरुन एक व्हिडिओ ट्वीट केला आहे. यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेलिकॉप्टरने नाशकात आले, त्यावेळचं दृश्य पाहायला मिळत आहे. ९ बॅगांमधून १२ ते १३ कोटी रुपये नाशिकला आले, असं संजय राऊत म्हणाले.



'मुख्यमंत्री खाऊ घेऊन आले तो क्षण! नाशिकमध्ये रात्रीस खेळ चाले.. नुसता पै पाऊस... दोन तासांच्या दौऱ्यासाठी इतक्या जड बॅगा पोलिस का वाहात आहेत? यातून कोणता माल नाशिकला पोहोचला? निवडणूक आयोग फालतू नाकाबंदी आणि झडत्या करत आहे. महाराष्ट्रात अधिकृत बॅगा वाटप सुरु आहे.' असं संजय राऊत यांनी व्हिडिओ ट्वीट करताना लिहिलं आहे.

संभाजीनगर, पुणे यासारख्या ठिकाणी काल रात्रीपासून पैशाचं वाटप, देवाण-घेवाण स्पष्ट दिसत आहे. हे आरोप नाहीत, स्पष्ट दिसतंय. धंगेकर पोलिस स्टेशनसमोर ठिय्या मांडून बसले आहेत. मोदी-फडणवीसांनी हे पाहून कायद्याची बूज राखावी. नगरमध्ये खुलेआम पैसे वाटताना लोकांनी विखेंच्या चिरंजीवांना पकडलंय. मुख्यमंत्र्यांच्या नाशकातील आगमनाचा व्हिडिओ मी ट्वीट केलाय, दोन तासांसाठी जड बॅगा कसल्या आहेत? ५०० सफारी-सूट घेऊन आले का? कोणत्या हॉटेलात गेल्या? याचे व्हिडिओ मी देणार आहे.

# केजरीवालांप्रमाणे मलाही जामीन द्या, सुप्रीम कोर्टात हेमंत सोरेन यांचा युक्तिवाद; ईडीला नोटीस

■ मुंबई: प्रथमेश चव्हाण

जमीन घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन हे तुरुंगात आहेत. त्यांच्या याचिकेवरुन सुप्रीम कोर्टाने ईडीला नोटीस पाठवली असून १७ मेपर्यंत उत्तर देण्यास सांगितलं आहे. सोरेन यांनी याचिकेमध्ये अरविंद केजरीवालांप्रमाणे जामीन मिळावा, अशी मागणी केली आहे. हेमंत सोरेन यांच्यावतीने त्यांचे वकील कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. केजरीवाल यांना निवडणूक प्रचारासाठी मिळालेल्या जामिनाचा उल्लेख त्यांनी केला. ते म्हणाले की, माझं प्रकरणही अरविंद केजरीवाल यांच्याप्रमाणेच आहे. मलाही निवडणूक प्रचारासाठी जामीन पाहिजे. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या बेंचने युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर ईडीला नोटीस



पाठवली आहे.

यापूर्वी झारखंड हायकोर्टाने अटकेविरोधातली हेमंत सोरेन यांची याचिका फेटाळून लावली होती. हायकोर्टाच्या ३ मेच्या आदेशाला सुप्रीम कोर्टात आव्हान दिलं होतं. सोरेन यांनी अटकेविरोधातील आपल्या याचिकेवर कोर्टाकडून निर्णय येईपर्यंत लोकसभा निवडणुकीत प्रचारासाठी अंतरिम जामीन मागितला होता.दरम्यान, अरविंद केजरीवाल यांना कोर्टाने प्रचारासाठी जामीन मंजूर केला आहे. तीन दिवसांपूर्वी ते तिहार जेलमधून बाहेर आले. बाहेर आल्यानंतर त्यांनी जाहीर सभा, रोड शो घेत प्रचार सुरु केला. त्यांनी नरेंद्र मोदी, भाजपवर सडकून टीका केली. भाजपला बहुमत मिळालं तर पुढचे पंतप्रधान नरेंद्र मोदी होणार नसून अमित शाह होणार आहेत, कारण मोदी ७५ वर्षांचे होत असून भाजपच्या नियमाप्रमाणे ते निवृत्त होतील.

# फिरण्यासाठी गेलेल्या मित्र-मैत्रिणीला लुटलं; निर्वस्त्र करत केली बेदम मारहाण

■ पुणे: अभिजीत येरल्लू

पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातून एक संतापजनक घटना समोर येतेय. एका महाविद्यालयीन जोडप्याला दोन गाव गुंडांनी निर्वस्त्र करत बेदम मारहाण केली. त्यानंतर मुलीच्या अंगावरील दागिने काढून घेतल्याची घटना विमानतळाच्या परिसरात घडलीय. याप्रकरणी पोलिसांत



तक्रार दाखल करण्यात आलीय. विमानतळाच्या परिसरात अशा लुटमारीच्या घटना घडत असल्याने नागरिकांकडून कायदा सुव्यवस्थेवर प्रश्न विचारला जात आहे.

याप्रकरणी मिळालेल्या अधिकच्या माहितीनुसार, बारामतीतील महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या एक युवती मोटारीतून आपल्या मित्रासह बारामती विमानतळ परिसरात फिरण्यासाठी गेली होती. ते कारमध्ये बसले होते. त्यावेळी तेथे आलेल्या दोन गावगुंडांनी चाकूचा दाखवत युवतीच्या अंगावरील ९० हजारांचे दागिने काढून घेतले. त्यानंतर दोघांच्या अंगावरील कपडे बळजबरीने काढायला लावले. जोडप्याला निर्वस्त्र केल्यानंतर त्यांचे फोटो काढून घेतले. हे फोटो व्हायरल करण्याची धमकी देत या दोघांनी जोडप्याला बेदम मारहाण केली.

याप्रकरणी बारामती पोलिसांनी दोन अनोळखी अज्ञातांवर जबरी चोरीचा गुन्हा दाखल केलाय. ही घटना बारामती तालुक्यातील विमानतळाजवळ गोजुबावी गावाच्या हद्दीत घडलीय. या घडलेल्या घटनेप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विमानतळाच्या बाजूला पीडित जोडपं फिरत होते, त्यावेळी तेथे ३५ वयोगटातील दोन जण तोंडाला मास्क लावून तेथे आले. त्या दोघांनी युवतीसह तिच्या मित्राला चाकूचा धाक दाखवत मुलीच्या गळ्यातील ७० हजारांची सोन्याची साखळी आणि कानातील टॉप्स असे ९० हजार रुपयांचे दागिने काढून घेतले. दागिने घेतल्यानंतर आरोपींनी मुलीच्या मित्राला दगडाने मारहाण केली. मारहाण केल्यानंतर दोघांनाही कारमधून बाहेर काढत खड्डा असलेल्या ठिकाणी त्यांच्या अंगावरील कपडे जबरदस्तीने उतरायला भाग पाडलं. या जोडप्याचे निर्वस्त्र अवस्थेतील फोटो काढून घेतले. पोलिसात गेला तर तुमचे काढलेले फोटो व्हायरल करू, अशी धमकी या लुटारूंनी दिली असल्याची माहिती पोलिसांकडे देण्यात आलेल्या तक्रारी म्हटलंय.

# एन्काउंटर स्पेशलिस्ट प्रदीप शर्मा यांना सुप्रीम कोर्टाचा सर्वात मोठा दिलासा

■ मुंबई: सचिन कदम

एन्काउंटर स्पेशलिस्ट प्रदीप शर्मा यांना सुप्रीम कोर्टाने सर्वात मोठा दिलासा दिला आहे. प्रदीप शर्मा यांना मुंबई हायकोर्टाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. दोन महिन्यांपूर्वी १९ मार्चला प्रदीप शर्मा यांना मुंबई हायकोर्टाकडून जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आल्याची माहिती समोर आली होती. मुंबई हायकोर्टाच्या या निकालाविरोधात प्रदीप शर्मा यांनी सुप्रीम कोर्टात दाद मागितली होती. सुप्रीम कोर्टात या प्रकरणी सुनावणी पार पडली. सुप्रीम कोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर प्रदीप शर्मा यांना कायम जामीन मंजूर केला आहे. विशेष म्हणजे सुप्रीम कोर्टाने मुंबई हायकोर्टाने दिलेल्या आदेशावर आश्चर्य व्यक्त केलं आहे. प्रदीप शर्मा यांच्या जामीन आणि स्थगिती मागणीवर सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. प्रदीप शर्मा यांना मुंबई पोलिसांकडे सरेंडर होण्याची अट सुप्रीम कोर्टाने रद्द केली आहे. सुप्रीम कोर्टाच्या डबल बेंचने याबाबतचे आदेश दिले आहेत. सात दिवसात जामीन प्रक्रिया पूर्ण करा, असे आदेश सुप्रीम कोर्टाने मुंबई सत्र न्यायालयाला दिले आहेत. न्यायमूर्ती ऋषिकेश रॉय, न्यायमूर्ती प्रशांत मिश्रा यांच्या द्विसदस्य खंडपीठाने हा निर्णय



दिला आहे. एन्काऊंटर स्पेशालिस्ट प्रदिप शर्मा यांना लखनभैय्या हत्या प्रकरणात सेशन कोर्टानं निर्दोश मुक्तता केली होती. मात्र, उच्च न्यायालयाने हा निकाल फिरवून प्रदीप शर्मा यांना दोषी ठरवलं होतं.

प्रदीप शर्मा यांनी त्यांच्या १३ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह ११ नोव्हेंबर २००६ ला अंधेरीतील सात बंगला येथे फेक चकमक घडवून आणल्याचा आरोप करण्यात आला होता. या चकमकीत त्यांनी लखनभैयाची हत्या केली होती. तसेच लखनभैयाची एन्काउंटरमध्ये हत्या झाल्याचा बनाव रचला होता, असा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी लखनभैयाचे वकील रामप्रसाद गुप्ता यांनी कोर्टात धाव घेतली होती. त्यांनी सातत्याने कोर्टात युक्तिवाद केला. कोर्टाने या प्रकरणी एसआयटी स्थापन करत चौकशीचे आदेश दिले होते. या प्रकरणी प्रदीप शर्मा यांना २००८ मध्ये निलंबित करण्यात आलं होतं. पण पुढे कोर्टाने त्यांची निर्दोष मुक्तता केल्यानंतर त्यांचं निलंबन मागे घेण्यात आलं होतं.

# निवडणुकीच्या धामधुमीत पाणथळींवर अतिक्रमण

■ नवी मुंबई: धनश्री सट्टा

**नवी मुंबईतील एनआरआय संकुलालगत असलेल्या पाणथळ जागेच्या काही भागावर खासगी विकासकाने अतिक्रमण केले आहे. फ्लेमिंगोच्या अधिवासाचे सर्वात मोठे केंद्र म्हणून 'डीपीएस' शाळेमागील या पाणथळ जागेच्या मार्गावर लोंखडी कुंपण टाकून ही जागा खासगी असल्याचे फलक लावण्यात आले. याबाबत पर्यावरणप्रेमी आणि स्थानिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त करत अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाईची मागणी केली.**

नवी मुंबईतील सीवूड्स भागातील टी. एस. चाणक्य सागरी प्रशिक्षण संस्थेच्या मागे असलेला चाणक्य तलाव, एनआरआय परिसरातील एनआरआय तलाव आणि डीपीएस तलाव या तीन पाणथळ जागांवर मोठया प्रमाणावर फ्लेमिंगो तसेच दुर्मिळ पक्ष्यांचा अधिवास दिसून येतो. शासकीय




यंत्रणा निवडणुक कामात व्यग्र असताना गेल्या काही दिवसांपासून पाणथळ परिसरात खासगी विकासक तसेच कंत्राटदारांचा वावर वाढल्याचे दिसून आले आहे. चाणक्य तलावाजवळ कांदळवनावर छुप्या पद्धतीने अतिक्रमण केले जात असल्याच्या तक्रारी आहेत. याशिवाय कांदळवनावर ज्वलनशील पदार्थ टाकून ते जाळण्याचे प्रकारही या भागात नित्याचे झाले आहेत. असे असताना एका खासगी विकासकाने तीन दिवसांपासून या भागात जाणारे मार्ग अडवून तेथे ही खासगी मालमत्ता आहे असे फलक लावल्याने तीव्र पडसाद उमटू लागले आहेत. पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटल्यानंतर सिडको प्रशासनाने पोलिसांच्या मदतीने विकासाने टाकलेले कुंपण हटविले. सिडको अथवा महापालिकेमार्फत मात्र अतिक्रमणाबाबत कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

नवी मुंबईतील एनआरआय संकुलाला लागून असलेल्या एका मोठया पाणथळींच्या पट्टयावर एका उद्योगपतीकडून बांधकाम प्रकल्पाचे काम हाती घेतले जाणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे याठिकाणी पाणथळी नसल्याचो पद्धतशीरपणे ठसविण्याचा प्रयत्न होत आहे. शनिवारी पाणथळ परिसरात जाण्याचा रस्ता बंद करून नागरिकांना रोखण्यात आले. पोलिसांकडे यासंबंधी तक्रार केल्यानंतर बेकायदा प्रवेशद्वार बनवण्याचे काम थांबवण्यात आले.- सुनील अग्रवाल, पर्यावरणप्रेमी

# 'आरटीई' प्रवेशांबाबत पेच; खासगी शाळांचे नवे 'गाऱ्हाणे'

■ पुणे: गणेश साळवी

'आरटीई'अंतर्गत २५ टक्के कोट्यासाठी नव्याने प्रवेश प्रक्रिया राबवावी लागल्यास, प्रवेश प्रक्रिया अगोदरच पार पडलेल्या असल्याने ते शक्य होणार नाही, अशी सबब खासगी शाळा सांगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यावर, 'संबंधित शाळांनी २५ टक्के जागा राखीव ठेवणे बंधनकारक असून, आता नव्याने प्रवेश प्रक्रिया राबवताना या राखीव जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावे लागतील,' असे शिक्षण विभागाचे म्हणणे आहे.

शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) नियमबदलांना मुंबई उच्च न्यायालयाने नुकतीच अंतरिम स्थगिती दिली. त्यामुळे शिक्षण विभागाला 'आरटीई'ची प्रवेश प्रक्रिया नव्याने राबवावी लागणार आहे. मात्र, अनेक खासगी शाळांची प्रवेश प्रक्रिया आधीच पूर्ण झाली असल्याने आता तेथे 'आरटीई'अंतर्गत प्रवेश कसे करायचे, असा नवा पेच निर्माण होणार आहे.

'आरटीई'अंतर्गत खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवर आर्थिक दुर्बल आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. या प्रवेशांसाठी राज्य सरकारकडून खासगी शाळांना या विद्यार्थ्यांच्या शुल्काची प्रतिपूर्तीही दिली जाते.मात्र, फेब्रुवारीमध्ये राज्य सरकारच्या शालेय शिक्षण विभागाने आरटीई कायद्यातील या नियमात बदल करून, खासगी शाळांच्या एक किलोमीटर परिसरात सरकारी वा अनुदानित शाळा असेल, तर २५ टक्के कोट्यातील विद्यार्थ्यांनी या सरकारी वा अनुदानित शाळेत प्राधान्याने प्रवेश घ्यावा, असा नवा नियम जारी केला. यामुळे २५ टक्के कोट्यातील विद्यार्थ्यांना बहुतांश खासगी शाळांची दारेच बंद झाली. परिणामी, यंदा या कोट्यातील प्रवेशांसाठी येणारे अर्ज खूप कमी आले. त्यामुळे या बदलाला पालक, संघटनांकडून विरोध करण्यात आला. या निर्णयाविरोधात मुंबई उच्च




न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. त्यानंतर उच्च न्यायालयाने आरटीई कायद्यातील बदलाला स्थगिती दिली. आता आरटीईची प्रवेश प्रक्रिया पूर्वीप्रमाणे नव्याने राबवायची झाल्यास प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेल्या खासगी शाळांमध्ये जागा कशा वाढवणार, असा प्रश्न खासगी शाळांच्या संचालकांनी उपस्थित केला आहे. 'पालकांनी इंग्रजी शाळा आणि मराठी शाळा असा भेदभाव करू नये. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये मातृभाषा किंवा स्थानिक भाषेतून शिक्षणास प्राधान्य देण्यात आले आहे. शासनाकडून जिल्हा परिषद, शासकीय शाळांवर खर्च केला जातो. या शाळांमध्येही गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते,' अशी भूमिका मांडून महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या उपाध्यक्ष जागृती धर्माधिकारी म्हणाल्या, की खासगी शाळांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली असल्याने आता न्यायालयाच्या निर्णयानुसार 'आरटीई'अंतर्गत प्रवेश द्यायचा झाल्यास अडचण निर्माण होणार आहे. त्या विरोधात न्यायालयात दाद मागावी लागेल.

# ठाणे जिल्ह्यात परराज्यातून येणारे लोंढे आवरा – राज ठाकरे

■ ठाणे: तृप्ती गोरे

यंदाच्या लोकसभा निवडणुकीसाठी मुद्दाच नसल्याचे मत मांडत ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात येणाऱ्या परप्रांतीयांच्या लोंढ्यांचा मुद्दा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी कळवा येथील सभेत बोलताना मांडला. खासदार झाल्यावर हे प्रश्न संसदेत मांडा आणि लोंढे आवरा, असा सल्लाही त्यांनी डॉक्टर श्रीकांत शिंदे आणि नरेश म्हस्के या दोन्ही महायुतीच्या उमेदवारांना दिला.

ठाणे लोकसभा मतदार संघातील शिंदेच्या शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के आणि कल्याण लोकसभा मतदार संघातील शिंदेच्या शिवसेनेचे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी कळवा येथे जाहीर सभा घेतली. आतापर्यंत आणीबाणी, बोफर्स, कांदा, बाबरी मज्जिद, विदेशी महिला, शायनिंग इंडिया, अशा मुद्द्यांवर लोकसभेच्या निवडणुका झाल्या. २०१४ आणि २०१९ मध्ये मोदी आणि पुलवामा मुद्द्यांवर निवडणुका पार पडल्या. यंदा निवडणुकीत मुद्दाच नसल्यामुळे आई बहिणींचा उद्धार केला जात असल्याचे मत राज ठाकरे यांनी व्यक्त केले.

लोकसंख्येच्या आधारावर महापालिकांची निंर्मिती केली जाते. ठाणे जिल्ह्यात बाहेरील राज्यातून येणाऱ्यांचे सर्वाधिक प्रमाण आहे. यामुळे राज्यातील एकट्या ठाणे जिल्ह्यात सात महापालिका आहेत. तर, इतर जिल्ह्यात केवळ एकच महापालिका आहे. देशातील ठाणे हा एकमेव असा जिल्हा आहे की इथे परराज्यातून येणाऱ्या लोंढ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. या जिल्ह्यामध्ये किती माणसे आली आणि किती माणसे येत आहेत, याचा अंदाज



नाही. आधीच ठाणे जिल्ह्यातील सगळ्या महापालिका विस्कटलेल्या आहेत. त्यात लोंढे वाटत राहिले तर त्या अजून विस्कटून जातील आणि मूळच्या माणसांच्या हाताला काहीही लागणार नाही, असेही ते म्हणाले. जिल्ह्यांमध्ये लोंढा येण्याचे प्रमाण वाढतच राहिले तर कितीही निधी आणून काम केले तरी ते पुरेसे पडणार नाही. त्यामुळे खासदार झाल्यावर हे प्रश्न संसदेत मांडा आणि लोंढे आवरा, असा सल्लाही त्यांनी डॉक्टर श्रीकांत शिंदे आणि नरेश म्हस्के या दोन्ही महायुतीच्या उमेदवारांना दिला.

अनेक वर्ष महाराष्ट्रात राहणाऱ्या अमराठींना माणसांना माझा विरोध नाही पण त्यांना फक्त एकच अट आहे ती म्हणजे मराठी भाषा बोलता पाहिजे, असेही ते म्हणाले.

राज्यात फोडाफोडीचे राजकारण शरद पवार यांनी सुरू केले. शिवसेनेने आमचे सहा नगरसेवक खोके देऊन फोडले, तेव्हा काहीच वाटले नाही आता टाहो फोडत आहेत. बाळासाहेब ठाकरे यांच्यावर खालच्या भाषेत टीका करणाऱ्या सुषमा अंधारे यांना पक्षात घेऊन पद दिले. तेव्हा कुठे गेले तुमचे वडीलप्रेम अशी टीकाही त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. मुंब्र्यात आतापर्यंत अतिरेक्यांना अटक करण्यात आलेल्या कारवाईचा पाढा त्यांनी वाचला. देश विघातक शक्ती दूर करण्यासाठी विकासाबरोबरच सुरक्षा महत्त्वाची असल्याचेही ते म्हणाले. आनंद दिघे यांच्यासोबत माझी चांगली मैत्री होती. मी ठाण्यात आल्यावर त्यांच्यासोबत शहरात फिरायचो. हे टुमदार शहर होते. त्यावेळी ठाणे शहराला तलावांचे शहर म्हटले जात होते. हे तलाव बुजले आणि आता टँकरने पाणी पुरवठा होतोय, असेही ते म्हणाले.